# मेहता मराठी ग्रंथजगत


एप्रिल - मे - जून - जुलै, २०२०

पृष्ठे ७०

वर्ष विसावे

अंक सातवा



महाराष्ट्रातील ३५ दिवसांचे
राजकीय महानाट्य आता
PBook आणि EBook मध्ये



ज्येष्ठ साहित्यिक, नाटककार, रंगकर्मी आणि राष्ट्रीय पुरस्कार विजेते चित्रपट दिग्दर्शक रत्नाकर मतकरी यांचे १७ मे, २०२० रोजी दु:खद निधन झाले. मतकरींच्या जाण्याने साहित्य आणि रंगभूमी या क्षेत्रात कधीही भरून न येणारी पोकळी निर्माण झाली आहे.




मतकरी सरांसारख्या समृद्ध लेखकाचं असं अचानक जाणं मराठी साहित्य जगतासाठी खरंच फार मोठी पोकळी आहे. त्यांच्या जाण्याने आम्ही आमचा दर्जेदार आणि लाडका लेखक गमावला आहे.

**-अनिल मेहता**

**-सुनील मेहता**

**-मेहता पब्लिशिंग हाऊस व मेहता बुक सेलर्स परिवार**


रत्नाकर मतकरी

**मतकरी सरांनी मेहता पब्लिशिंग हाऊसला दिलेल्या शुभेच्छा...**

टाळेबंदी दरम्यान आमचा अंक
आपल्यापर्यंत पोहोचवता आला नाही याबद्दल क्षमस्व...

तुमच्या आमच्यासारखीच पुस्तकंही बंद होती कपाटात
आपल्या हक्काच्या माणसाच्या स्पर्शाला आसुसलेली
या तीन महिन्यात त्यांनीही अनुभवलीय टाळेबंदी
आता पुस्तकांना ओढ लागलीय तुमच्या स्पर्शाची...

आमचं दालन खुलं झालं आहे. या आणि
या पुस्तकांना सोबत घेऊन जा...
पुन्हा अनुभवा नव्या करकरीत पानांचा स्पर्श...

**वाट पाहतंय तुमचं लाडकं**

**मेहता पब्लिशिंग हाऊसचं दालन...**

# मेहता मराठी ग्रंथजगत

◆ एप्रिल-मे-जून-जुलै २०२० ◆ वर्ष विसावे ◆ अंक सातवा

**संपादक**
सुनील मेहता

**कार्यकारी संपादक**
शंकर सारडा

**संपादन साहाय्य**
योजना यादव

**अंकाची किंमत १५ रु.**
वर्गणी मनीऑर्डरने अथवा ऑनलाईन पाठवावी.

**प्रसिद्धी :**
दरमहा ११ तारखेस
**मांडणी-अक्षरजुळणी**
*मेहता पब्लिशिंग हाऊस*


## — अनुक्रमणिका —


| | |
|---|---|
| **संपादकीय** | ४ |
| **श्रद्धांजली** | १३ |
| **पुस्तक परिचय** | |
| महामानव सरदार पटेल | १७ |
| इ.स. २५९५ | १९ |
| सत्तरीतला भारत | २३ |
| महात्मा गांधी आणि त्यांचा भारतीय संघर्ष | २७ |
| नाकोहस | ३१ |
| हेलमेट्स | ३५ |
| दडलेला इतिहास | ३९ |
| काँग्रेस विरुद्ध महाराष्ट्र | ४१ |
| आचार्य अत्रे आणि बारा गावचं पाणी | ४५ |
| प्रतिभेचा इंद्रधनू | ४९ |
| आहे कट्टर तरी | ५३ |
| झुबेदा | ५७ |
| **अभिप्राय** | ६० |



संपादक-मुद्रक-प्रकाशक : सुनील मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड, टेलिफोन भवनसमोर,
पुणे ४११ ०३० फोन : ०२०-२४४७६९२४/२४४७५४६२
E-mail : mmgj@mehtapublishinghouse.com

'मेहता मराठी ग्रंथजगत' हे मासिक मालक, मुद्रक व प्रकाशक सुनील अनिल मेहता यांनी जय गणेश ऑफसेट, २०/१डी/१अ, सोमवार पेठ, महाराजा लॉज मागे, पुणे- ४११०११ येथे छापून मेहता होम, १व२ मजला, १९४१, सदाशिव पेठ, पुणे - ४११०३० येथे प्रसिद्ध केले. संपादक - सुनील अनिल मेहता.

'Mehta Marathi Granth Jagat' monthly is owned, Printed & Published by Sunil Anil Mehta, Printed at Jai Ganesh Offset, 20/1D/1A, Somvar Peth, Behind Maharaja Lodge, Pune – 411 011 & Published at Mehta Home, 1 & 2 Floor, 1941, Sadashiv Peth, Pune – 411 030. Editor – Sunil Anil Mehta.

**सं पा द की य**

कोरोनानं देशात पाय पसरायला सुरुवात केली आणि आपल्या जगण्याचे आयामच बदलले. एका क्षणात सारं जग स्तब्ध झालं. एका क्षणात जगभरचे उद्योग, व्यवसाय सारं थांबलं. आणि जगालाच जणू टाळं लागलं. हा वैश्विक बदलाचा काळ संपूर्ण मानव जातीसाठी नवा धडा शिकवणारा आहे. या काळात आपण अनेक गोष्टींसाठी नवेनवे पर्याय शोधून जगणं सुसह्य करू पाहतो आहे. आणि प्रकाशन व्यवसाय तर याला अपवाद कसा असेल? म्हणूनच आपण आता थोड्या काळासाठी डिजिटल माध्यमाच्या आधारे भेटतो आहोत.

कोरोनाचा काळ हा वैश्विक बदलांचा आरंभबिंदू आहे. आणि त्याचा मानवी जीवनावर दीर्घकालीन परिणाम घडणार आहे. आणि आपल्या वाचन-लेखन सवयींवरही हा दीर्घकालीन परिणाम करण्याची शक्यता आहे. आपण कितीही ठरवलं तरी पूर्वीसारखे मोकळेपणाने बाहेर पडून पुस्तक खरेदीचा मनसोक्त आनंद लुटू शकणार नाही. बाहेर पडलो तरी भीतीचं थोडं सावट असेलच, त्यामुळे आपण नव्या वाचन सवयी अंगीकारण्यासाठी स्वागतशील होऊ, अशी आशा करायला हरकत नाही. याचा प्रत्ययही गेल्या दोन महिन्यांत आला आहे. टाळेबंदीमुळे छापील पुस्तकांची विक्री मधल्या काही काळात बंद होती. त्यावेळी ईबुक्स आणि ध्वनीमुद्रित पुस्तकांच्या विक्रीत विलक्षण वाढ झाल्याचे आढळून आले आहे.

मेहता पब्लिशिंग हाऊसने काळाची पावले ओळखत यापूर्वीच आपली सर्व ईबुक्स बाजारात आणली आहेत.

त्यामुळे या काळात ॲमेझॉन, गुगल प्ले आणि आय ट्युनससारख्या माध्यमातून वाचकांनी मेहता पब्लिशिंग हाऊसच्या पुस्तकांचा आस्वाद घेतला. त्यामुळे टाळेबंदी असली तरी जगभरच्या वाचकांना आपल्या प्रकाशनाची पुस्तके उपलब्ध झाली. त्यामुळे वाचनात खंड पडला नाही.

या काळात अनेक वाचकांनी फेसबुक, इन्स्टाग्रामसारख्या सोशल मीडियाच्या व्यासपीठांवरून पुस्तकांच्या प्रचार - प्रसाराचे कामही केले. अनेक उत्साही वाचकांनी फेसबुकवर लाईव्ह सेशन करत मेहता पब्लिशिंग हाऊसच्या पुस्तकांची वाचकांना ओळख घडवली. शिवाय मेहता पब्लिशिंग हाऊसच्या फेसबुक पेजवरून अनेक कलाकारांनीही लाईव्ह येत पुस्तक वाचनाचा आस्वाद दिला. या लाईव्ह सेशनलाही वाचकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. एकीकडे कोरोनामुळे भयाचं आणि निराशेचं वातावरण वाढू लागलेलं असताना ही पुस्तके मात्र सकारात्मकतेचा संदेश देत राहिली आणि वाचकांनीही तो संदेश अचूक टिपला.

कोरोना काळात छपाईची प्रक्रिया थांबलेली होती. त्यामुळे छापील पुस्तके प्रकाशित करता आली नसली तरी मेहता पब्लिशिंग हाऊसने आपली पुस्तक प्रकाशनाची बांधिलकी कायम ठेवली आणि या टाळेबंदीच्या काळात दोन पुस्तके ई-बुक्स स्वरूपात प्रकाशित केली. डॉ. अनिल गांधी आणि अमृता देशपांडे यांच्याद्वारा लिखित आणि संपादित **'कोरोना नकोना'** हे प्रासंगिक पुस्तक टाळेबंदीच्या काळात प्रकाशित करण्यात आले. तर जीतेंद्र दीक्षित लिखित आणि पराग पोतदार द्वारा अनुवादित **'३५ दिवस'** हे पुस्तकही ई-बुक्स स्वरूपात वाचकांना उपलब्ध करण्यात आले.

'३५ दिवस' हे महाराष्ट्रातील ३५ दिवसांच्या राजकारणाच्या महानाट्यावर आधारित पुस्तक आहे. या पुस्तकाचा झूमच्या माध्यमातून प्रकाशन सोहळाही घेण्यात आला. एबीपी माझाचे मुख्य संपादक राजीव खांडेकर यांच्या उपस्थितीत झूम सेशनवर हा प्रकाशन सोहळा पार पडला. मराठीत प्रथमच या निमित्ताने असा आगळावेगळा प्रकाशन सोहळा पार पडला.

एकूणच कोरोना काळात अनेक गोष्टी गमावल्यासारखे वाटत असले तरी अनेक नव्या गोष्टीही गवसल्या. या नव्याने गवसलेल्या ज्ञानाचा आधार घेऊन आपली पुढील वाटचाल कायम राहणार आहे; पण ही वाटचाल करत असताना आपण स्वत:सोबतच संपूर्ण समाजाच्या आरोग्यासाठी बांधिल आहोत, ही समजही अंगीकारायला हवी.

वाचत राहा... सुरक्षित राहा...



# मेहता मराठी ग्रंथजगत

## नवनवीन पुस्तकांच्या अद्ययावत माहितीसाठी आजच वर्गणीदार व्हा.

### आमच्या छापील अंकाची वर्गणी

त्रैवार्षिक वर्गणी ४५०रुपये
पंचवार्षिक वर्गणी ६००रुपये

### डिजिटल अंकाची वर्गणी

त्रैवार्षिक वर्गणी ३००रुपये
पंचवार्षिक वर्गणी ४००रुपये

आमच्या पुस्तकांविषयी आणि नवीन योजनांविषयी जाणून घेण्यासाठी

### सर्व ग्रंथालयांना नम्र विनंती

कृपया आपला संपूर्ण पत्ता, (तालुका, जिल्हा, पिनकोडसहित), मेल-आयडी, फोन नंबर, मोबाईल नंबर ही माहिती आमच्या खालील व्हॉट्स अप नंबरवर कळवावी.

९४२०५९४६६५

## वाचकांसाठी सुवर्णसंधी!

# WORDPOWER

## बेळगाव / कोल्हापूर

पुस्तके, खेळणी, स्टेशनरी, म्युझिक,
मूव्ही, गेम्स इत्यादी बरेच काही
आता वर्डपॉवरच्या एकाच दालनात उपलब्ध आहे.
सुट्टीचा आनंद पुरेपूर लुटण्यासाठी अवश्य भेट द्या.

**बेळगाव, कोल्हापूर येथील वर्डपॉवरचे पत्ते पुढीलप्रमाणे**

कामत टॉवर, पहिला मजला, आरपीडी कॉलेजसमोर,
टिळकवाडी, बेळगाव -५९०००६.
मोबाईल - ७८८८२७७१९०

स्टार बझार, जुना पुणे-बेंगलोर हायवे, कोल्हापूर – ४१६००१.
मोबाईल - ९५१८९१२२६९

**अधिक माहितीसाठी संपर्क**

**wordpowerbookshop@gmail.com**

Find us on Facebook

https://www.facebook.com/mehta.publishinghouse

सर्व प्रकारची महाविद्यालयीन पुस्तके, यूपीएससी, एमपीएससी,
सेट-नेट, इंजिनिअरिंग, मेडिकल, मॅनेजमेंट, सायन्स, कॉम्प्युटर इ.
विविध विषयांवरील क्रमिक व संदर्भ पुस्तके यांचे माहेरघर

# मेहता बुक सेलर्स

३२२, भाऊसिंगजी रोड, भवानी मंडपाजवळ,
कोल्हापूर ४१६ ०१२
वेळ : सकाळी ९.३० ते रात्री ८ (शनिवारी बंद)
फोन : (०२३१) २५४२९०१/२५४२३०४/२५४१८८१
Email : mehtabooksellers@gmail.com

**मेहता पब्लिशिंग हाऊस**

amazon

GET IT ON Google Play

यांच्या संयुक्त विद्यमाने

नाहीत स्कॅन केलेली पाने किंवा नाहीत पीडीएफ्स...
मराठीत प्रथमच, खरीखुरी eBooks युजर फ्रेंडली, वाचायला सोपी,
सोयीस्कर- थेट तुमच्या कॉम्प्युटर, आयपॅड आणि अॅन्ड्रॉइड टॅब्लेटवर!

इथे मिळतील ई-बुक्स...

**eBooks**




**www.amazon.in**

**play.google.com**

**Online** पुस्तके खरेदी करा **www.mehtapublishinghouse.com**

## नवीन संहिता... नवा आशय...




**लेखक व संपादक**
**अनिल गांधी | अमृता देशपांडे**

ऐतिहासिक काळापासून अनेक सूक्ष्मजीवांनी मानवजातीला नष्टतेच्या उंबरठ्यावर नेऊन ठेवल्याची उदाहरणे आहेत. जगभरात वेगवेगळ्या वेळी, वेगवेगळ्या ठिकाणी पसरलेल्या साथींच्या आणि माणसानं त्याविरुद्ध दिलेल्या लढ्याच्या मन विषण्ण करणाऱ्या कहाण्या आहेत. त्यातून जगभरातल्या वैज्ञानिक, डॉक्टर्स आणि सामान्य माणसांनी या संकटातून मार्ग काढण्यासाठी दिलेल्या योगदानामुळे अनेक आशेची किरणं दिसत आहेत. कोरोनाच्या वैश्विक संकटामुळे या विषयाची पुन्हा उजळणी करणं गरजेचं बनलं आहे. या विषयाला रोगाचा आणि औषधाचा वास असला तरी, आजच्या काळात हे बाळकडू देणं गरजेचं वाटल्यामुळे डॉ. अनिल गांधी आणि अमृता देशपांडे यांनी या पुस्तकात या विषयाला हात घातलेला आहे. सोबतच माजी सनदी अधिकारी अविनाश धर्माधिकारी, मानसोपचार तज्ज्ञ डॉ. हमीद दाभोळकर, पर्यावरण अभ्यासक डॉ. रविंद्र व्होरा यांच्यासारख्या मान्यवरांनी या विषयाचा विविधांगी आढावा घेतला आहे.

◆

**किंमत : ९९/- रु. (ई-बुक स्वरूपात उपलब्ध)**

**नवीन संहिता... नवा आशय...**

# ३५ दिवस



**लेखक**
**जीतेंद्र दीक्षित**

**अनुवाद**
**पराग पोतदार**

महाराष्ट्र विधानसभेच्या २०१९च्या निवडणुकांचे निकाल लागण्यापासून ते शिवसेना - राष्ट्रवादी काँग्रेस - काँग्रेस आघाडी प्रणित सरकार स्थापनेपर्यंतचा ३५ दिवसांचा काळ म्हणजे जणू एका महानाट्याचा काळ होता. २८ नोव्हेंबर, २०१९ रोजी उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्रिपदाची शपथ घेईपर्यंतच्या लक्षवेधी घटनांनी जनतेला टीव्ही माध्यमांशी अक्षरश: चिकटवून टाकले होते. राजकीय पंडितांनांही अचंबित करणारे या ३५ दिवसांतले चढ-उतार या पुस्तकात संगतवार विस्ताराने समोर येतात. महाराष्ट्राच्या राजकारणाचा चेहरामोहरा बदलण्यासोबतच या काळाने सर्वच राजकीय चेहऱ्यांचे नकाब उतरवले. या विलक्षण रिपोर्ताजमध्ये या नाट्यात सहभागी असलेले आणि याचे साक्षीदार असलेल्यांच्या मुलाखतींच्या माध्यमातून पडद्यामागच्या नाट्याचा चेहराही स्पष्ट होतो.

◆

**किंमत : २३५/- रु. (ई-बुक स्वरूपात उपलब्ध)**

# झूमवरून '३५ दिवस' पुस्तकाचं प्रकाशन

## टाळेबंदीमुळे पारंपारिक पुस्तक प्रकाशनाला नवा पर्याय
## महाराष्ट्रातील राजकीय महानाट्य पुस्तकरूपात



**झूमवरून जीतेंद्र दीक्षित लिखित आणि**
**पराग पोतदार द्वारा अनुवादित '३५ दिवस'**

पुणे - टाळेबंदीने भलेही समारंभांना कात्री लागली असेल, पण मराठी पुस्तक प्रकाशन सोहळ्यांना यातून नवी वाट गवसली आहे. मेहता पब्लिशिंग हाऊसने ऐन टाळेबंदीच्या काळातच जीतेंद्र दीक्षित लिखित आणि पराग पोतदार यांचे द्वारे अनुवादित '३५ दिवस' हे पुस्तक प्रथम ई-बुक स्वरूपात प्रकाशित केले आहे. या पुस्तकाचे एबीपी माझा वृत्तवाहिनीचे मुख्य संपादक राजीव खांडेकर यांच्या उपस्थितीत १२ जून रोजी झूम सेशनद्वारे प्रकाशन करण्यात आले. महाराष्ट्रातील ३५ दिवसांच्या राजकीय महानाट्यावर प्रकाशझोत टाकणारे हे पुस्तक आहे.

कोरोना आणि टाळेबंदीने आपल्या जगण्याचे आयामच बदलले आहेत. याला प्रकाशन व्यवसायही अपवाद नाही. पण तरीही पुस्तक विश्वाने नव्या वाटांचा शोध सुरू केला आहे. नव्या डिजिटल माध्यमांचा यथोचित

वापर करत मेहता पब्लिशिंग हाऊसने आपले नवे पुस्तक उपलब्ध केले आहे. जीतेंद्र दीक्षित लिखित '३५ डेज' हे पुस्तक अनुवादाच्या स्वरूपात मराठी वाचकांसाठी उपलब्ध झाले आहे. राजीव खांडेकर यांच्यासह, लेखक जीतेंद्र दीक्षित, अनुवादक पराग पोतदार आणि प्रकाशक सुनील मेहता यांच्या उपस्थितीत झूम सेशनमध्ये या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले.

महाराष्ट्राच्या २०१९च्या, विधानसभा निवडणुकांचे निकाल लागल्यानंतर सत्ता स्थापनेला तब्बल ३५ दिवसांचा कालावधी लागला. या महानाट्याने देशात नवा राजकीय इतिहास घडला. या महानाट्याची सांगोपांग मांडणी '३५ दिवस' पुस्तकात करण्यात आली आहे. मेहता पब्लिशिंग हाऊसने प्रथम ई-बुक स्वरूपात हे पुस्तक उपलब्ध केले असून ते ॲमेझॉन (Amazon), गुगल प्ले (Google Play) आणि आय ट्युनवर (I Tune) उपलब्ध असेल, तर पुस्तकाची छापील आवृत्ती पुढील पंधरा दिवसांत उपलब्ध होईल.

या पुस्तकाचे महत्त्व विशद करताना राजीव खांडेकर म्हणाले, ''प्रासंगिक विषयांवरील पुस्तकांमुळे समकालीन इतिहासाचे दस्तावेजीकरण होते, जे पुढील पिढ्यांसाठी महत्त्वाचे असते. दुर्दैवाने मराठीत प्रासंगिक पुस्तकांचे प्रमाण कमी होत चालले आहे. अशात महाराष्ट्रात जे ३५ दिवसांचे राजकारण झाले, त्याने इथल्या राजकारणाचा चेहरामोहरा बदलून टाकला आहे. ही ऐतिहासिक बाब पुस्तकरूपात येणे गरजेचे होते. त्यामुळे या राजकारणाशी संबंधित गॉसिप आणि अस्सलपणा हेसुद्धा वाचकांसमोर येईल.''

जीतेंद्र दीक्षित म्हणाले, ''एक पत्रकार म्हणून महाराष्ट्रातील राजकीय नाट्य मी जवळून अनुभवले आहे. या राजकारणात पडद्यासमोर ज्या गोष्टी घडत होत्या, त्याहून अधिक मोठं नाटक पडद्याआड घडत होतं, जे वाचकांसमोर आणण्याचा माझा प्रयत्न आहे.

यावेळी पराग पोतदार यांनी या पुस्तकाच्या अनुवादाविषयी आपले मनोगत व्यक्त केले, तर प्रकाशक सुनील मेहता यांनी पुस्तकाच्या प्रकाशनामागची भूमिका स्पष्ट केली.

◆

श्रद्धांजली

## ज्येष्ठ लेखिका विजयाताई जहागीरदार यांना विनम्र श्रद्धांजली !!!




ज्येष्ठ लेखिका आणि २० व्या अखिल भारतीय मराठी बालकुमार साहित्य संमेलनाच्या अध्यक्षा विजया श्रीनिवास जहागीरदार यांचे १ एप्रिल २०२० रोजी वार्धक्याने निधन झाले. त्यांच्या पश्चात मुलगा अ‍ॅड. शेखर, कन्या माधुरी भिरंगी, संगीता सोमण, सून, जावई आणि नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर मोदी स्मशानभूमीत सायंकाळी सहा वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले.

विजया जहागीरदार यांचा जन्म १२ सप्टेंबर १९३२ रोजी इंदूर येथे झाला. त्यांनी विविध विषयांवर पन्नास वर्षांहून अधिक काळ लेखन केले. कवयित्री म्हणून त्यांनी मराठी साहित्यात मोलाचे योगदान दिले आहे. आकाश मोगरा, स्त्री नक्षत्र, रातवा, गीत गीता, कल्पवृक्षाची फळे, गीत मेघदूत - शाकुंतल हे काव्यसंग्रह त्यांचे गाजले. कर्मयोगिनी, रणयोगिनी, ययातिकन्या माधवी, मनगुंफा, आत्मसाक्षी, अर्धविराम, नियंती, उद्रेक, टाचलेलं फुलपाखरू, वास्तु - जुई, रिंगणभूल या त्यांच्या कादंबऱ्या तर केसरपक्षी, वेंधळी, अग्निक्षण, कालचक्र, शापित गुलमोहर, निवडुंगाचा मोहर,

तिने काय करावे?, बिनपानांची झाडं हे कथासंग्रह त्यांच्या नावावर आहेत. बालसाहित्यातील त्यांचे योगदानही फार मोलाचे आहे. सुगंध, भिरभिरं, टीम टिम टिकली, निर्मळ कहाण्या, मोहराचं झाड, एकदा असं झालं आणि इतर कथा हे सर्व बालकथासंग्रह प्रसिद्ध आहेत. विविध वृत्तपत्रात त्यांनी स्तंभलेखन केले. शिवाय आकाशवाणीवरून त्यांच्या ययातिकन्या माधवी आणि काव्य कोडी या पुस्तकाचे वाचन मुंबई आकाशवाणीवर झाले.

## ‘अक्षरकार’ कमल शेडगे यांना विनम्र श्रद्धांजली !!!



सुप्रसिद्ध ‘अक्षरकार’ कमल शेडगे यांचं ३ जुलै २०२० रोजी मुंबईतील राहत्या घरी हृदयविकारानं निधन झालं. ते ८५ वर्षांचे होते.

कमल शेडगे यांना मुळात चित्रकलेची आवड होती. १९५५ साली टाइम्स ऑफ इंडियात नोकरी सुरू केल्यानंतर ते अक्षरलेखनाकडे वळले. महाराष्ट्र टाइम्स सुरू झाल्यानंतर त्यांनी मराठी अक्षरलेखन सुरू केले. १९६२ साली ‘रायगडाला जेव्हा जाग येते’ या नाटकासाठी त्यांनी पहिल्यांदा ‘लेटरिंग’ केलं. त्यानंतर त्यांनी कधीच मागे वळून पाहिले नाही.



गेली ३० वर्षे मेहता बुक सेलर्समध्ये स्वत:ला झोकून देऊन काम करणारे आमचे सहकारी अमर चौगुले (अमरदा) यांचे ७ जून रोजी दीर्घ आजारामुळे निधन झाले. प्रचंड मेहनती आणि विश्वासू अशी त्यांची ओळख होती.
**अशा आमच्या अमरदांना मेहता पब्लिशिंग हाऊस आणि मेहता बुक सेलर्सकडून भावपूर्ण श्रद्धांजली.**

## ज्येष्ठ लेखक रत्नाकर मतकरी यांना
## नटवर्य प्रभाकर पणशीकर रंगभूमी जीवनगौरव पुरस्कार !!!



मुंबई, दि. १ – राज्य शासनामार्फत देण्यात येणारा नटवर्य प्रभाकर पणशीकर रंगभूमी जीवनगौरव पुरस्कार ज्येष्ठ साहित्यिक, नाटककार, आस्वादक स्वर्गीय रत्नाकर मतकरी यांना जाहीर झाला आहे. रु. ५ लाख, मानपत्र आणि सन्मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरुप आहे.


सांस्कृतिक कार्य मंत्री अमित विलासराव देशमुख यांच्या अध्यक्षतेखालील निवड समितीने रत्नाकर मतकरी यांच्या रंगभूमीवरील बहुमूल्य योगदानाचा गौरव, २०१९-२० या वर्षासाठीच्या नटवर्य प्रभाकर पणशीकर जीवनगौरव पुरस्काराने करण्यासाठी शिफारस केली होती, परंतु कोरोना विषाणूच्या पार्श्वभूमीवर राज्यात लॉकडाऊन लागू झाल्याने पुरस्काराची घोषणा आणि प्रदान समारंभ होण्यापूर्वीच रत्नाकर मतकरी यांचे आकस्मिक निधन झाले. त्यामुळे २०१९-२० या वर्षासाठीचा नटवर्य प्रभाकर पणशीकर जीवनगौरव पुरस्कार स्वर्गीय रत्नाकर मतकरी यांना मरणोत्तर घोषित करण्यात आला आहे.

श्री. मतकरी यांनी नाटक, एकांकिका, बालनाट्य, कथा, गूढकथा, कांदबरी, ललित लेख, वैचारिक साहित्य अशा सर्व साहित्य प्रकारांत दर्जेदार आणि सातत्यपूर्ण लेखन केले. साहित्यिक, रंगकर्मी, दिग्दर्शक, निर्माता आणि चित्रकार म्हणूनही त्यांनी मोलाचे योगदान आहे. त्यांनी महाराष्ट्रात बालरंगभूमीची मुहूर्तमेढ रोवून, सुमारे तीस वर्षे पदरमोड करुन बालनाट्यांची निर्मिती केली. मतकरी यांच्या कार्याचा गौरव अनेक पुरस्कार आणि सन्मान देऊन करण्यात आला आहे. संगीत नाटक अकादमी आणि साहित्य अकादमी या दोन्ही मान्यवर संस्थांकडून पुरस्कारप्राप्त ठरलेल्या मोजक्या व्यक्तिमत्त्वांत त्यांचा समावेश होतो.

नटवर्य प्रभाकर पणशीकर रंगभूमी जीवनगौरव पुरस्कार यापूर्वी प्रभाकर पणशीकर, विजया मेहता, भालचंद्र पेंढारकर, मधुकर तोरडमल, सुलभा देशपांडे, सुधा करमरकर, आत्माराम भेंडे, अरुण काकडे, श्रीकांत मोघे, रामकृष्ण नायक, लीलाधर कांबळी, बाबा पार्सेकर आणि जयंत सावरकर यांना प्रदान करण्यात आला आहे.

◆

**TBC - 29 Book No. 2**




# चेसिंग टुमॉरो

**सिडनी शेल्डन**

अनुवाद
**टिली बॅगशॉ**

**सिडने शेल्डनच्या कल्पक साहित्यबीजातून साकारलेली ट्रेसी आणि तिच्या अद्भुत साहसांची उत्कंठावर्धक कथा...**


**किंमत : ४५०/- रु.**

**TBC - 29 Book No. 3**

# रिव्हर गॉड

**विल्बर स्मिथ**


अनुवाद
**सुभाष जोशी**




**नाइल नदीच्या काठावरील प्राचीन इजिप्तचं वैभव आणि तात्कालीन सौंदर्यवादी विचारसरणीचं प्रतिक असणारी लालित्यपूर्ण कादंबरी...**

**किंमत : ७५०/- रु.**

पुस्तकपरिचय




# महामानव सरदार पटेल


(ई-बुक स्वरूपातही उपलब्ध)

**दिनकर जोषी**

अनुवाद
**सुषमा शाळिग्राम**

श्री. दिनकर जोषी यांचे नाव मराठी वाचकांच्या परिचयाचे झाले आहे. ‘चरित्रात्मक कादंबरी’ हा साहित्यप्रकार गुजराथी साहित्यविश्वात त्यांनी प्रथमच आणला आणि रूढ केला असे म्हटले, तर वावगे ठरणार नाही. आचार्य द्रोण, तथागत बुद्ध, गुरुदेव रवीन्द्रनाथ ठाकूर, कवी नर्मद, महंमद अली जीना, महात्मा गांधीचा पुत्र हरिलाल गांधी अशा वेगवेळ्या काळातील, वेगवेगळ्या स्वभावप्रकृतीच्या व्यक्तींचे कादंबरीच्या आकृतिबंधातून केलेले चरित्रचित्रण मराठी वाचकांनी यापूर्वी अनुभवलेले आहे. ‘महामानव सरदार पटेल’ कादंबरीतून त्यांनी सरदार वल्लभभाई पटेलांचे जीवितकार्य वाचकांपुढे ठेवले आहे. यशस्वी बॅरिस्टर असलेल्या वल्लभभाई झवेरभाई पटेलांना वयाच्या बेचाळिसाव्या वर्षापर्यंत भारतातील राजकारणाशी दुरून परिचय होता; परंतु थेट संबंध आला नव्हता. गांधीजींच्या प्रभावी व्यक्तिमत्त्वाने भारावून जाऊन ते काहीशा अनपेक्षितपणे राजकारणात उतरले. त्यानंतर मात्र त्यांनी तनमनधनाने भारतासाठी स्वत:ला झोकून दिले. त्यांच्यातील प्रेमळ पिता, कर्तव्यदक्ष बंधू, कणखर, निर्भीड राजकारणी, तत्त्वनिष्ठ नेता लेखकाने विविध प्रसंगांतून रंगवला आहे. देशातील तसेच जगातील राजकीय आणि सामाजिक परिस्थितीची त्यांची विलक्षण जाण, देशबांधवांसाठीची आणि देशाच्या कल्याणासाठीची आंतरिक तळमळ, गांधीजींच्या ठायी असलेली त्यांची निष्ठा आणि त्यातून आलेला, त्यांच्या ‘लोहपुरुष’ प्रतिमेशी वरकरणी सुसंगत न वाटणारा अति हळवेपणा यांचे अत्यंत प्रभावी चित्रण लेखकाने केले आहे. फाळणी स्वीकारून मिळालेल्या विभाजित भूभागातून सार्वभौम भारत राष्ट्राची निर्मिती होणे शक्य नाही; देशभर विखुरलेली ५६२ संस्थाने जोपर्यंत स्वतंत्र भारतात विलीन होत नाहीत, तोपर्यंत भारत हा एकसंध देश, एक राष्ट्र म्हणून कधीच अस्तित्वात येऊ शकणार नाही, या गोष्टीचे त्यांना सर्वांगीण भान होते. संस्थानांचे विलीनीकरण हा त्यांच्या कार्यातील मानाचा तुरा ठरला. या विलीनीकरणासाठी त्यांनी केलेले प्रयत्न, अंमलात आणलेले डावपेच, दाखवलेला मुत्सद्दीपणा, धोरणी दीर्घदृष्टी, प्रसंगी कारवाई करण्याचे त्यांचे धाडस इत्यादी पैलू लेखकाने निरनिराळ्या प्रसंगांतून सविस्तरपणे वर्णिले आहेत. जवाहरलाल नेहरू आणि गांधीजी यांच्याशी वेगवेगळ्या वेळी, वेगवेगळ्या मुद्यांवर सरदारांचे तात्त्विक मतभेद झाले असले, तरी या दोघांविषयीचा त्यांचा आंतरिक जिव्हाळा किती सच्चा होता, हे लेखकाने अनेक प्रसंगांतून चित्रित केले आहे. हातातोंडाशी आलेला पंतप्रधानकीचा प्याला गांधीजींच्या इच्छेखातर त्यांनी अत्यंत सहजपणे सोडून दिला, हे त्यांच्या स्वभाववैशिष्ट्याला साजेसेच होते. ◆

पुस्तक परिचय




# इ.स.२५९५

(ई-बुक स्वरूपातही उपलब्ध)

**कल्पना कुलश्रेष्ठ**

अनुवाद
**मीरा नांदगावकर**

## विज्ञानाची विधायकता आणि भयावहता याचं दर्शन घडविणाऱ्या कथा

'इ.स. २५९५' हा डॉ. कल्पना कुलश्रेष्ठ यांनी लिहिलेला आणि मीरा नांदगावकर यांनी अनुवाद केलेला विज्ञानकथासंग्रह आहे. या कथासंग्रहात एकूण अठ्ठावीस कथा आहेत.

छोट्या मुलाच्या कल्पनेमुळे अतिरेक्यांनी ओलीस ठेवलेल्या लोकांची कशी सुटका होते त्याची कथा 'तेविसाव्या शतकातील एक दिवस' मध्ये आहे. किशोरवयीन मुलाला त्याच्याच वयाची मुलगी त्याला हव्या असलेल्या वातावरणाच्या ग्रहाची सफर घडवते असे वर्णन 'साईगा ग्रहाची यात्रा' कथेत आहे. अभ्यासाचा कंटाळा करणाऱ्यांसाठी विविध विषयांच्या नॅनो मेमरी कार्ड्सची संकल्पना 'ऐलीच्या दुनियेत' कथेमध्ये आहे.

भविष्यात सुखाने जीवन जगायचे तर बेसुमार वृक्षतोड थांबवून वृक्षलागवड करायला हवी, असा संदेश 'प्लाण्टो ग्रहाचे निवासी' कथेतून दिला आहे. जाहिरातबाजीला भुलून काही लोक स्वत:च कसे आपले नुकसान करून घेतात ते 'अभ्यासाची गोळी' या कथेत सांगितले आहे. निसर्गाचा आनंद घेण्यासाठी परग्रहावरून आलेले विशिष्ट प्राणीच गुलमोहराच्या झाडावर खेळत व बागडत असतात हे रहस्य 'गुलमोहर आणि भुते' या कथेमध्ये आहे.

भविष्यकाळातील अद्‌भुत व चमत्कारिक बाजाराचे चित्र 'बाविसाव्या शतकातील एक बाजार' मध्ये आहे. प्रदूषण आणि ग्लोबल वॉर्मिंगमुळे होणारा विनाश टाळायचा असेल तर माणसांनी पूर्वी झालेल्या चुका यापुढे होणार नाहीत याची दक्षता घ्यायला हवी असा संदेश 'नवे घर' कथेत आहे. सुवर्णग्रहावर सर्व सोनेरी असले तरी निसर्गातला जिवंतपणा आणि सौंदर्य यांचा अभावच असतो या आशयाची कथा 'निर्जीव सोने'मध्ये आहे.

अपयशाने निराश न होता सत्य स्वीकारून अधिक जोमाने प्रयत्न केल्यास हमखास यश मिळतेच असा संदेश 'भेट पऱ्यांशी' कथेत आहे. अभ्यासाला कोणताही शॉर्टकट किंवा यांत्रिक/तांत्रिक पर्याय नसतो; मन लावून अभ्यास करणे हाच योग्य मार्ग असतो, असा आशय 'मायाजाल' मध्ये आहे. दहशतवादी संघटना टेलिपोर्टेशनचा गैरवापर करणार असे दिसताच त्याविरोधात एका मुलाने सुचवलेल्या कल्पनेला सुधारित मूर्त रूप देऊन त्याद्वारे ती संघटना कशी जेरबंद करण्यात आली त्याचे वर्णन 'कथा टेलिपोर्टची' मध्ये आहे. सुख, समाधान आणि शांती मिळवताना मानवाने

आपले जगणेच यांत्रिक करून स्नेह, विचारशक्ती व स्वातंत्र्य गमावता कामा नये असा इशारा 'राहुलचा निर्धार' कथेतून दिला आहे.

या बाल विज्ञानकथांबरोबरच अन्यही विज्ञानकथा या कथासंग्रहात आहेत. वैज्ञानिक प्रयोग माणसाला प्रगतिपथावर नेतात; पण या प्रयोगांमध्ये काही त्रुटी राहिल्या, चूक झाली किंवा त्या प्रयोगाचा कुणी गैरवापर केला तर किती गंभीर समस्या उद्‌भवू शकतात आणि माणसाच्या भावविश्वाला त्यामुळे कसा सुरुंग लागतो, असं सर्वसाधारण या कथांचं सूत्र आहे.

'जिवंत मशीन' या कथेतील प्रो. समीर, रीबी नावाचा स्त्री रोबोट बनवतात; पण रीबीकडून सरिताचा खून होतो... 'विचित्र नाती' कथेतील विनय आणि मनोरमा हे दाम्पत्य परस्परांवर प्रेम करणारं... पण मनोरमाला जीवघेणा अपघात होतो आणि ती मरणाच्या दारात पोचते... विनय तिला क्लोनिंगद्वारे जिवंत ठेवू पाहतो... पण त्यामुळे कशी गुंतागुंत होते? 'आणि एक स्वप्न विरले' या कथेत परस्परांना ओळखत नसलेल्या चार व्यक्ती काही कारण नसताना आत्महत्या करतात... पण पोलीस तपासात आत्महत्यांमागचं वैज्ञानिक सत्य उलगडतं... काय असतं ते सत्य?... वैज्ञानिक प्रयोगांतून उद्‌भवलेल्या गंभीर समस्यांचं भेदक आणि उत्कंठावर्धक चित्रण या कथांतून कल्पना कुलश्रेष्ठ यांनी केलं आहे.


एकूण, या कथा काल्पनिक तरी विज्ञानावर आधारित व प्रबोधनपर आहेत. तसेच मनोरंजनाबरोबरच संस्कारक्षम वयातील मुलांना सकारात्मक संदेश देणाऱ्या आहेत.

◆

**मोबाइलमध्ये बनवा समृद्ध लायब्ररी**
**ई-बुक्सचा खजिना आला तुमच्या दारी...**

**आपली लाडकी पुस्तकं... कधीही... कुठेही...**
**ebooks च्या रूपात**
**मराठीतल्या दिग्गज लेखकांपासून लिहित्या सर्जनांपर्यंत**
**हजारो पुस्तके एका क्लिकवर...**

# लेट हर फ्लाय




**झियाउद्दीन युसफझाई**


अनुवाद
**डॉ. शुचिता नांदापूरकर-फडके**

## झुंजार व विश्वव्यापक लढा...

'लेट हर फ्लाय' पुस्तकात पाकिस्तानातील डोंगरदऱ्यांमध्ये वसलेल्या छोट्याशा खेड्यातील एका लहान मुलाचा प्रवास मांडला आहे. ज्याने पुढे जगभरात समानता आणण्यासाठी अथक परिश्रम घेतले. झियाउद्दीन यांनी दहशत आणि आर्थिक दुर्बलता अशा दोन्ही पातळ्यांवर परिस्थितीशी झुंजत जगासमोर नवा आदर्श उभा केला. तसेच यापुढे एक पाऊल टाकत त्यांचा लढा वीस वर्षांपासून विश्वव्यापक केला. त्यातूनच ते आजतागायत जगातील सर्व मुलींसाठी लढा देत आहेत. 'लेट हर फ्लाय' मधील युसफझाई यांचा प्रवास जगभरातील मुली आणि स्त्रियांसाठी प्रत्येकाने 'का लढा दिला पाहिजे?' हा संदेश पोहोचवतो.

**किंमत : १९५/- रु. (ई-बुक स्वरूपातही उपलब्ध)**

पुस्तकपरिचय




# सतरीतला भारत

(ई-बुक स्वरूपातही उपलब्ध)

**रोशन दलाल**

अनुवाद
**जोसेफ तुस्कानो**

## सत्तर वर्षांचा जोखालेखा

डॉ. रोशन दलाल या उच्चविद्याविभूषित असून शाळांपासून ते विश्वविद्यालयापर्यंत त्यांनी शिक्षिका म्हणून ज्ञानदानाची भूमिका बजावली आहे. त्याच वेळी त्यांनी 'पुफिन हिस्टरी ऑफ इंडिया', 'दी पुफिन हिस्टरी ऑफ वर्ल्ड', 'दी रिलिजन्स ऑफ इंडिया' ही त्यांची अभ्यासपूर्ण संशोधनात्मक मार्गदर्शक अशी गाजलेली पुस्तके नजरेआड करता येणार नाहीत. 'India At 70' या इंग्रजी पुस्तकाचाही त्यात समोवश करावा लागेल. या पुस्तकाचा मराठी अनुवाद 'सत्तरीतला भारत' या नावाने विज्ञान लेखक जोसेफ तुस्कानो यांनी आपल्या सिद्धहस्त लेखणीतून साकारला आहे. मेहता पब्लिशिंग हाऊस या ख्यातनाम प्रकाशनाने प्रकाशित केलेले आहे.

१४ ऑगस्ट, १९४७ रोजीच्या मध्यरात्री ब्रिटिशांचा युनियक जॅक झेंडा जाऊन भारताचा तिरंगा अस्मानात विहार करू लागला. त्या रोमहर्षक, ऐतिहासिक दिवसापासून गेली ७० वर्षे भारत खंडात ज्या ज्या राजकीय, सामाजिक, साहित्यिक, सांस्कृतिक, ऐतिहासिक, आर्थिक, शैक्षणिक, आरोग्य व क्रीडाविषयक घडामोडी घडलेल्या आहेत. या प्रत्येक क्षेत्रात भारत देशाने केलेल्या प्रगतीचा आढावा या पुस्तकात प्रामाणिकपणे घेण्याचा प्रयत्न स्पृहणीय आहे.

एखाद्या व्यक्तीने आपल्या वयाची 'सत्तरी' पार करणे ही सर्वसामान्य घटना असते; मात्र एखाद्या देशाने 'सत्तरी'ची घोडदौड करणे ही खूप अभूतपूर्व, ऐतिहासिक घटना असते. या पुस्तकात गेल्या सत्तर वर्षांतल्या काळातील प्रत्येक वर्षी घडलेल्या घटनांवर दृष्टीक्षेप टाकण्यात आला आहे. भारतातील राजकीय पार्श्वभूमीवर या देशातली भव्य, दिव्य, समृद्ध संस्कृती, विविधता, विविध भाषा, ख्यातकीर्त व्यक्ती आणि सर्व क्षेत्रांतली यशोगाथा यांचा मागोवा प्रामाणिकपणे व अभ्यासू मनोवृत्तीने घेतलेला दिसून येतो.

प्रत्येक प्रकरणाचा प्रारंभ त्या त्या वर्षाच्या मुख्य राजकीय घटनेवर प्रकाशझोत टाकून केलेला आहे. तद्नंतर निवडक व्यक्तिमत्त्वे आणि त्या वर्षीच्या सांस्कृतिक, साहित्यिक, क्रीडाविषयक घटना यावर प्रकाश टाकण्यात आला आहे. अखेरीस काही ठळक घटनांचा नाममात्र उल्लेख आहे. त्याचवेळी समर्पक छायाचित्रे, रेखाटने दिलेली आहेत. आणि हे देत असताना तळटीप म्हणून पानोपानी संदर्भग्रंथांची सूचीही देण्याचा सूज्ञपणा

दाखवला आहे. त्यामुळे जागृत, जिज्ञासू व अभ्यासू वाचकांना मूलस्रोताकडे जाता येऊ शकते.

कोणत्याही देशाची प्रतिमा ही चित्रपट, साहित्य, संगीत, नृत्य आणि कला या विविध क्षेत्रांत घडलेल्या घटनांतून आविष्कृत होत असते. त्या त्या घडलेल्या घटनांमुळे संबंधित देशाची समृद्धी, श्रीमंती व विकासाकडे केलेली वाटचाल याचा प्रत्यय येत असतो. त्यामुळे 'मी एक भारतवासी' म्हणून हे सर्व वाचून उरात अभिमान भरून येतो. भारतातील या महान विभूती व त्यांनी केलेल्या कार्यामुळे आदर दुणावतो. या अभ्यासपूर्ण, संशोधनात्मक माहितीमुळे काही वाचकांच्या ज्ञानाची उजळणी होईल. काही वाचकांच्या ज्ञानात अधिक भर पडेल, काही वाचकांची जिज्ञासा अधिक जागृत होऊन अधिक जाणून घेण्याची जाणीव वृद्धिंगत होईल.

या पुस्तकात विविध अंगाने परामर्श घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. ''मी जर पशु-पक्ष्यांवर प्रेम करत नसेन तर मी परमेश्वरावर देखील प्रेम करत नसतो.'' असे कळकळीने सांगणारे शिक्षणतज्ज्ञ साधू वासवानी भेटतात. ''मुलांना वाचनातून प्रथम जगातील जादुई किमयेची माहिती मिळाली पाहिजे.'' असे आवर्जून भाष्य करणारे भारताचे माजी राष्ट्रपती झाकीर हुसेन आपल्याला प्रभावित करतात. तसेच ''मिस वर्ल्ड'' हा किताब जिंकणारी पहिली एशियन तरुणी रिरा फारिया यांच्या प्रेमकहाणीचे दर्शन घडते. 'भारत माझा देश आहे', ही राष्ट्रीय प्रतिज्ञा लिहिणारे तेलगू लेखक पी. व्ही. सुब्बाराव सोबत 'उडणारा शीख' म्हणजे मिल्खा सिंग आपल्या नजरेत भरतो. त्याचवेळी कवयित्री कमला दास यांच्या कवितेच्या ओळीही मनाला साद घालतात–

'मी आहे लाखो मृत्युंची प्रतिनिधी
सुकून गेलल्या बियांच्या झुपक्यासारखी
गळून पडेल मातीत, पुन्हा रुजवण्यासाठी
आणखीन कुणाच्या तरी आठवणीत'

या पुस्तकाचे वैशिष्ट्य म्हणजे आपण हवं ते पान उघडावे आणि त्या-त्या वर्षी घडलेल्या वैशिष्ट्यपूर्ण घटना वाचून इतिहासाच्या काळात वावरत असताना वर्तमानकाळाच्या प्रकाशात भविष्याचा वेध घेऊ शकतो. साध्या, सोप्या, ओघवत्या पण लालित्यपूर्ण भाषेत पुस्तकाची मांडणी केलेली आहे.


सदर पुस्तक शिक्षक, विद्यार्थी, प्राध्यापक, अभ्यासक, पत्रकार, लेखक व पालक यांना जसे उपयुक्त आहे तसेच IAS, IPS विविध स्पर्धा परीक्षांना बसणाऱ्या उमेदवारांना उपयुक्त ठरेल. तसेच गेला बाजार 'कौन बनेगा करोडपती' विविध प्रश्नमंजूषा स्पर्धेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्यांसाठी मार्गदर्शक ठरेल. या पुस्तकात गेल्या ७० वर्षांतील स्वातंत्र्योत्तर काळातील राजकारण, समाजकारण, अर्थकारण, खेळ, संगीत, साहित्य इ. क्षेत्रांतील ठळक घटनांचा ऊहापोह आहे.

◆


**मेहता पब्लिशिंग हाऊसची ई-पुस्तके**
**#AmazonKindle वर उपलब्ध आहेत.**
**#Lockdown मध्ये घरी बसल्या तुम्ही ही पुस्तके वाचू शकता.**



पुस्तक परिचय




# महात्मा गांधी

## आणि त्यांचा भारतीय संघर्ष

**जोसेफ लेलिव्हेल्ड**

अनुवाद
**मुक्ता देशपांडे**

## महात्मा गांधींच्या राजकीय आणि लौकिक जीवनाचा अभ्यासपूर्ण वेध

महात्मा गांधी... हयात असताना आणि मृत्यूनंतरही वेगवेगळ्या कारणांनी सदैव चर्चेत राहिलेले व्यक्तिमत्त्व. सत्य, अहिंसा यांच्या पुरस्कारामुळे आणि एकूणच त्यांच्या राजकीय, सामाजिक कार्यामुळे, आदर्शांमुळे गांधी केवळ भारताचेच नेते नव्हते, तर जगभरातील लोकांवर त्यांचा प्रभाव होता. अशाच प्रभावातून जोसेफ लेलिव्हेल्ड यांनी 'ग्रेट सोल महात्मा गांधी ॲन्ड हिज स्ट्रगल विथ इंडिया' हे पुस्तक लिहिले. त्याचा मराठीत अनुवाद केला आहे मुक्ता शिरीष देशपांडे यांनी. मराठी शीर्षक आहे, 'महात्मा गांधी आणि त्यांचा भारतीय संघर्ष.'

महात्मा गांधींच्या जीवनावर लिहिण्यात आलेले हे एक अस्सल पुस्तक असून, ते त्यांच्या सफल आणि निष्फळ ठरलेल्या कार्यांचा लेखाजोखा मांडते. भारताचे लक्ष वेधून घेण्यात त्यांना आलेल्या यशाविषयी आणि भारताच्या स्वातंत्र्यलढ्याला एका सामूहिक चळवळीचे स्वरूप देण्यात त्यांना मिळालेल्या सफलतेविषयी हे पुस्तक सांगते. तसेच देशातील अल्पसंख्याकांना, बहिष्कृत आणि गरीब जनतेला सामाजिक न्याय मिळवून देण्यासाठी महात्मा गांधींनी समोर ठेवलेल्या महत्त्वाकांक्षी उद्दिष्टांना तोंडी आश्वासने देण्यापलीकडे त्यांच्या बहुतेक अनुयायांनी काही केले नाही याची प्रत्यक्ष गांधींना वाटलेली खंतही जाणवून देते.

लेखकाने सुस्पष्ट आणि अभूतपूर्व बारकाव्यांनिशी, गांधींनी पाहिलेली मोठ्या कार्याची स्वप्ने, सामाजिक मूल्यांचे त्यांना आलेले भान आणि अहिंसक प्रतिरोधाचे त्यांचे तत्त्वज्ञान परक्या उपखंडात (दक्षिण आफ्रिकेत त्यांनी घालविलेल्या दोन दशकांत) कसे फुलले, पोसले गेले आणि त्यांना 'महात्मा' म्हणून डोक्यावर घेणाऱ्या भारताने गांधींनी पाहिलेल्या सामाजिक उत्क्रांतीच्या ध्येयमार्गावर अगदी थोडी वाटचाल करून, त्यांची परीक्षा कशी घेतली याचे वर्णन आहे.

वकिली करण्यासाठी गांधी दक्षिण आफ्रिकेत गेले. त्यांनी तेथे काम करणारे भारतीय तसेच तेथील खाणकामगारांवर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध केलेल्या विविध चळवळी, गरीब लोक, अल्पसंख्याकांना हरप्रकारे केलेली मदत याची माहिती पुस्तकात आहे. गांधी हे सुद्धा एक मनुष्यच होते. मानवी स्वभावातील सर्व प्रकारची गुंतागुंत (जराशी जास्तच!) आणि विरोधाभास यांनी ते युक्त होते; साहजिकपणे त्यांचे दक्षिण आफ्रिका व भारतातील

वैयक्तिक - खासगी, कौटुंबिक आणि ते राजकीय व सामाजिक नेते असल्यामुळे सार्वजनिक जीवन आणि त्यामध्ये त्यांना भेटलेली अनेक माणसे, तसेच आलेले विविध अनुभव याचे वर्णनही पुस्तकात आहे.

यातील कथानायक अर्थात, महात्मा गांधी एक प्रतिष्ठित वकील, जो राजकीय आणि सामाजिक कृति-कार्यक्रमांना स्वत:ला वाहून घेताना पंचा गुंडाळलेला संन्यासी कसा होतो याचे मनोज्ञ दर्शन घडते. या नि:स्वार्थी नेत्याच्या आयुष्यातील वीरश्रीपूर्ण आणि शेवटच्या महिन्यांमधील शोकात्म घडामोडींमधून या नेत्याने दीर्घ काळापासून उभारलेल्या अहिंसक चळवळीचे पर्यवसान शेवटी भारताच्या विभाजनात, पाकिस्तानच्या निर्मितीत कसे झाले आणि जातिसंहाराच्या रक्तपाताने डागाळलेला हा प्रवास अखेरीस त्यांच्या स्वत:च्या हत्येपाशी जाऊन कसा थांबला, याचे वर्णन सुन्न करणारे आहे.

भारत आणि भारतीय राजकारण्यांनी गांधींना त्यांच्या नावापुढे 'राष्ट्रपिता' ही उपाधी लावून मोठ्या तत्परतेने मखरात बसविले; पण त्याच तत्परतेने त्यांची शिकवण त्यांनी अंगीकारली नाही. गांधींना नेतेपदी चढविण्यास कारणीभूत असलेला मुस्लिमांचा पाठिंबा लवकरच क्षीण होत गेला आणि ज्या पददलित अस्पृश्यांसाठी गांधी आयुष्यभर हिंदूंची समजूत घालत राहिले, त्यांनी आपले स्वतंत्र नेतृत्व तयार केले. आज भारतात, 'गांधीवादी' हा शब्द अटळपणे सामाजिक भान या अर्थी वापरला जातो. महात्मा गांधींनी घालून दिलेल्या धैर्य, चिकाटी, गरिबांविषयीची कळकळ, नि:स्वार्थीपणा या उदाहरणात अजूनही प्रेरणा देण्याची शक्ती आहे. ही प्रेरणादायक शक्ती त्यांच्या अहिंसा व प्रतिरोधाच्या तंत्रापेक्षा, सिद्धान्तांपेक्षाही जास्त; किंबहुना सूतकताई, आहार आणि कामजीवन अशा विषयांवरील त्यांच्या विविध मतप्रणालींपेक्षा आणि घोषणांपेक्षाही जास्त आहे. कदाचित लोक ती प्रेरणा घेतील. अर्थात असं वारंवार घडेलच हे सांगता येणार नाही; पण कोणाला ती घ्यायची असेल, मनावर बिंबवायची असेल, तर ती अजून जागृत आहे आणि जेव्हा ती बिंबविली जाईल तेव्हा तिच्या परिणामांना 'गांधीवादी'च म्हटले जाईल.


महात्मा गांधींच्या जीवनावरील हे पुस्तक त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विविध अंगांनी वेध घेते. संदर्भग्रंथ म्हणूनही या पुस्तकाचा अभ्यासकांना उपयोग होऊ शकेल.

◆

# नेव्हर मॅरी अ वुमन विथ बिग फीट

**मिनेक शिप्पर**

अनुवाद
**वर्षा वेलणकर**





**जगभरच्या स्त्रीविषयक म्हणींचे अफलातून संकलन...**

स्त्रीचा देह असो वा आत्मा... जगभरच्या म्हणींनी या स्त्रीरूपाचे नानाविध आविष्कार सादर केले आहेत. या म्हणींमधून स्त्रियांचं सामाजिक स्थान अधोरेखित होतं. याचं सखोल चिंतन आणि २४५ भाषांमधील स्त्रीविषयक म्हणी आणि त्यांची विश्लेषणे या पुस्तकात समाविष्ट आहेत. लेखिका मिनेक शिप्पर यांच्या अतिशय रंजक व टीकात्मक संकलन शैलीमुळे जगाच्या कानाकोपऱ्यातील शाश्वत तरीही सतत विकसनशील असलेल्या म्हणींमधून स्त्री व पुरुष दोघेही किती विकसित झाले आहेत, याची एक ढोबळ आकृती वाचकांसमोर स्पष्ट होते.

◆

**किंमत : ६५०/- रु. (ई-बुक स्वरूपातही उपलब्ध)**

पुस्तक परिचय




# नाकोहस

**(ई-बुक स्वरूपातही उपलब्ध)**

**पुरुषोत्तम अग्रवाल**

अनुवाद
**सुनीता देवस्थळी**

## धर्माच्या नावावर चाललेल्या दंडुकेशाहीचं वास्तव चित्रण

राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक आणि किती काय काय बाबतींत पाहता पाहता जग खूप बदलत गेलं. ऊठसूठ कोणीही 'आमच्या भावना दुखावल्या' गेल्याचं भांडवल करून का असेना; पण आपलं घोडं पुढे दामटत असतं. गुंडगिरी करून आपल्या मनाप्रमाणे करून घेत असतं. मतांचं राजकारण खेळत राजकारणीसुद्धा अशांना पाठीशी घालत असतात. मीडियाला छोट्या छोट्या गोष्टींना मोठं रूप देऊन दिवसभर त्यावरच पाल्हाळ लावत बसण्यात मजा वाटते. त्या दिवसभराच्या प्रसारित होणाऱ्या प्रकाशझोतासाठी आसुसलेले लोक समाजात विनाकारण कुरापती काढत असतात. तत्त्वानं वागणारे, बुद्धीच्या कसावर जग पारखणारे, खऱ्या अर्थानं प्रामाणिकपणे जगू पाहणारे, आपल्यासारख्या निधर्मी देशात निर्मळ मनानं, खरोखरीच धर्मसहिष्णुतेनं राहू पाहणारे मात्र या अशा वातावरणात भरडले जातात. हे आजच्या काळातलं वास्तव लक्षात घेऊन पुरुषोत्तम अग्रवाल यांनी त्याभोवती एक काल्पनिक चित्र मोठ्या कल्पकतेनं रंगवलं आहे 'नाकोहस' या कादंबरीतून. मराठीत भाषांतर केलं आहे सुनीता देवस्थळी यांनी.

सुकेत, रघू आणि शम्स या तीन भिन्न धर्मांच्या तरीही वैचारिक साम्य असलेल्या बुद्धिजीवी मित्रांची ही कथा. धर्मापेक्षा माणुसकीला महत्त्व देणारे हे तिघं मित्र माणुसकीतच देवाचं देवपण शोधत आहेत. आपल्या निधर्मी देशात मात्र त्यांना धर्मसहिष्णुतेचं दर्शन घडत नाहीये. जनतेत जागृती निर्माण करण्यासाठी ते परखड लेख लिहीत आहेत. हीच गोष्ट समाजकंटकांच्या भावना दुखावतेय. याच कारणामुळे आयुष्यात शारीरिक मारहाण आणि मानसिक क्लेश सहन केलेलं हे त्रिकूट, आहत भावनांचं अवडंबर माजवणाऱ्यांपुढे प्रश्न टाकतंय, ''आम्ही आमच्या लेखातून कोणाला शिव्या तर दिलेल्या नाहीत! परंपरा, संस्कृती आणि धर्माच्या नावावर चालू असलेल्या हिंसक राजनीतीच्या विरोधात केलेल्या पोलिटिकल अर्ग्युमेंट्समध्ये हर्ट सेंटिमेंट्स्चा प्रश्न येतो कुठे?'' पण दंडुकेशाहीनं, कांगावखोर वृत्तीनं आपल्या तथाकथित दुखऱ्या भावनांची किंमत वसूल करणाऱ्यांना सहसा शब्दाला शब्दानं उत्तरं देण्याची सवयच नसते. किंवा 'भावना दुखावणाऱ्यां' चे अर्थातच त्यांच्या हुकमाची अंमलबजावणी न

करणाऱ्यांचे शारीरिक आणि मानसिक हाल करण्यात त्यांना एक प्रकारचं स्वर्गीय सुख लाभत असतं. अशा परिस्थितीत मार खाणाऱ्यांकडे दोनच पर्याय शिल्लक राहतात; पहिला म्हणजे डोक्यात पक्कं ठसवायचं की या काळात यशस्वितेचा... खरंतर जिवंत राहू शकण्यापर्यंतचा मंत्र हाच आहे की, 'ऑलवेज बी ऑन द राइट साइड ऑफ द हर्ट सेंटिमेंट....' किंवा मानसिक संतुलन ढळतंय, सत्यात आणि स्वप्नातही नजरेसमोर फक्त आणि फक्त भयावह दृश्य तरळत आहेत, हे जाणवत असूनही अगतिकपणे पाहत राहायचं, समाजाला लागलेल्या वाळवीसोबत जगायची सवय स्वत:ला लावून घ्यायची.

म्हणूनच 'आहत भावनां' च्या भोवऱ्यात सापडलेल्या या तीन मित्रांच्या मानसिकतेविषयी भाष्य करताना लेखक म्हणतो, ''भारतवर्षाला खड्ड्यात जाण्यापासून थांबवण्यासाठी स्वत:ला खड्ड्यात झोकलेलं; जीवन अधिक चांगलं करण्याच्या फंदात आयुष्यभर झक मारलेलं; आयुष्याच्या कथानकात अधिकांश वेळा डझनाच्या हिशेबात वैफल्यगाथा लिहून बसलेलं हे त्रिकूट; त्यांच्यावर जेव्हा खूप मोठा आघात व्हायचा, तेव्हा हसायचे; ते जेव्हा आपापल्या एकांतात असायचे तेव्हा हसायचं आणि समजायचं खड्ड्यातल्या फुफाट्यापासून काही वेळापुरती का असेना सुटका झाली... सुटकेतला भ्रामकपणा जाणून पुन्हा हसायचे.''

आयुष्याच्या उत्तरार्धात मात्र एक सत्य त्यांच्या गळी उतरलंय की ही साली धर्मनिरपेक्षताच तर आपल्या देशात आहत भावनांची ॲम्ब्युलन्स ठरतेय; भावना दुखावल्या गेलेल्यांची ॲम्ब्युलन्स आणि बुद्धिजीवींची शववाहिनी... तरीही प्रश्न उरतोच.... असं कसं बदललं हे जग; कुठं राहिला तो देश; जिथं आम्ही जन्मलो, जिथं आम्ही मरू इच्छित होतो?

प्रस्तुत कादंबरीत 'नाकोहस' म्हणजेच 'नॅशनल कमिटी ऑफ हर्ट सेंटिमेंट'चा प्रतिनिधी, क्षणोक्षणी रंग बदलणाऱ्या एका सरड्याच्या रूपात आपल्या समोर येतो आणि त्याला मदत करणारे, भावना असूनही स्वत:ला भावनाशून्य भासवणारे त्यांचे मदतनीस - 'बौनैसर' म्हणजे 'बौद्धिक, नैतिक, समाजरक्षक' अशी काल्पनिक पात्रं उभी करून लेखकाने हल्लीच्या सामाजिक परिस्थितीवर ताशेरे ओढले आहेत. एक प्रकारे ही कादंबरी म्हणजे एक करुण रूपकच आहे असं म्हटलं तरी वावगं ठरू नये.


स्वत:पुरतं पाहून खरंतर कूपमंडूक वृत्तीनं राहणाऱ्या सामान्य जनतेविषयी भाष्य करताना लेखक म्हणतो... 'गणपतीचं वाहन सारं जग होत चाललंच आहे...' जगातला प्रत्येक सुजाण नागरिक आज उंदीर होऊन आपापल्या बिळात स्वत: सुरक्षित आहे एवढ्यावरच समाधानी आहे; बाहेर आहत भावनांच्या नावानं होणारा प्रलयंकारी, मनमानी उत्पात नजरेआड करून!

कुठल्याही घटनेचा सरळ सरळ उल्लेख न करता; तरीही सुज्ञ वाचकांना त्या त्या घटना आठवायला आणि विचार करायला भाग पडणारं हे लेखन आहे. त्या घटनेच्या अनुषंगानं विस्मृतीत गेलेल्या पौराणिक कथा आणि काव्यांची योग्य त्या जागी झालेली पेरणी, हे या कादंबरीचं वैशिष्ट्यच म्हणायला हवं.

एकूण, कादंबरी सर्वसामान्यांच्या जाणिवांना आव्हान देणारी नक्की ठरेल.

◆

पुस्तक परिचय




# हेल मेट्स

(ई-बुक स्वरूपातही उपलब्ध)

**डॉ. नंदकुमार उकडगावकर**

## शाब्दिक कोट्यांनी नटलेलं पुस्तक

सत्य आठवणी व काल्पनिक प्रसंग यांना विनोदाचा मसाला लावून द्वैअर्थी शब्दांची फोडणी देऊन डॉ. नंदकुमार उकडगावकर यांनी लिहिलेल्या अठरा लेखांचा संग्रह आहे 'हेल मेट्स.' शाब्दिक कोट्या हा त्यांचा गाभा! रोजच्या वापरातील शब्दांना वेगळे संदर्भ लावून हास्य फुलवता येते हे दाखवण्यासाठी केलेला हा खटाटोप आहे. लेखक सांगतात- 'इंग्रजीतला हेल्मेट हा शब्द मराठीत 'हेल मेट' असा लिहून 'नरकातही मित्र' हा अर्थ त्यांना अभिप्रेत आहे. मित्रमंडळींनी लहानपणी शाळेत केलेल्या एकत्रित कारवायांमुळे एकजात सगळे नरकात जाणार, असा मला दृढ विश्वास आहे. अगदी स्वर्गातसुद्धा गेलो तरी त्या जागेचं नरकातच रूपांतर होईल. शाळेत खोडी करणाऱ्याचं नाव सरांनी विचारल्यावर आमच्यातील कुणाचंच तोंड उघडायचं नाही. त्या अर्थानं आम्ही एकमेकाचं सुरक्षाकवच- हेल्मेट- होतो.'

या लेखसंग्रहाचं एक वैशिष्ट्य आहे, ते म्हणजे-अर्धा शब्द मराठीतला व अर्धा इंग्रजीतला घेऊन काही नवीन शब्द तयार केले आहेत. त्यामुळे उच्चार जरी सारखा असला तरी त्यातून दोन वेगवेगळे अर्थ निघतात. उदा. बायो व matric = बायोमॅट्रिक, sir व कारनामे = सरकारनामे. या शिवाय प्रचलित शब्दांना नवे अर्थ लावण्याचा प्रयत्नही त्यांनी केला आहे. उदाहरणार्थ पाठ्यपुस्तक = पाठीवरचा मजकूर, शिरजोर = डोक्याचा जोर. हे नवीन शब्दप्रयोग. 'सवंगडी,' 'माझे हेलमेट,' 'माझं पाषाणयुग,' 'माझं पाठ्यपुस्तक,' 'आमची स भु' या लेखांमध्ये शाळेतील आठवणी आहेत. सोबत आत्मचरित्राच्या जवळपास जाणारे 'माझं 'कृष्णा'यण,' 'आमचं 'वैद्य'कीय महा 'विद्या'लय,' 'किस्सा एमडीचा' व 'मा मा (माझी मास्तरकी)' लेखही आहेत.

महाविद्यालयात शिकताना व निवासी डॉक्टर म्हणून काम करताना आलेल्या गमतीदार प्रसंगांनी लेखकाच्या जीवनात वेगळीच खुमारी आणल्याचे ते सांगतात. सर्व लेखांत शाब्दिक कोट्यांचा जागोजागी वापर केला आहे जसे -'त्याची एकच महत्त्वाकांक्षा होती - आयफेल टॉवरवर जाऊन चहात बुडवून पार्ले जी बिस्कीट खाण्याची. पुढे तो खरंच 'आय फेल, आय फेल' करत राहिला.'

'प्रदीप पोळ हे प्रकरण वेगळंच होतं. आशावहिनी त्याच्याशी केलेल्या लग्नानंतर पोळलेल्या होत्या (पोळ झाल्या होत्या.)'

'मला एक प्रश्न लहानपणापासून सतावत आलाय. मिठाईमध्ये साखर

असूनही मिठाई या शब्दात मीठ का आलं? तिला 'साखराई' का म्हणत नाहीत?'

'माझे सवंगडी मला सरपंत म्हणत (म्हणजे इंग्रजीत Serpent!).'

'मी न्युरॉलॉजी निवडलं, त्याचं श्रेय माझी पत्नी सुषमालाच! ती नेहमी म्हणायची 'तुम्हाला नवरालॉजी छान जमते; मग न्युरॉलॉजीसुद्धा चांगली जमेल.'


'माझा वाढदिवस,' 'आजोबांचा जन्मदिवस,' 'दोन लग्नांची एकच गोष्ट' हे लेख खरोखर घडलेल्या प्रसंगांवर आधारित आहेत. अर्थात ते वाचनीय व्हावेत म्हणून थोडा मसालाही वापरल्याचे त्यांनी म्हटले आहे. 'देव-दानव,' 'टी ट्वेंटी सामना,' 'दोन खटल्यांचा खटला,' 'सूर्याचं निधन' हे लेख संपूर्ण काल्पनिक आहेत.

अशा तऱ्हेनं जीवनातील मसालेदार आठवणी व त्यांना दिलेली काल्पनिकाची जोड, हा या संग्रहाचा गाभा आहे.

◆



# कॉर्पोक्षेत्र




**दीपक कौल**

अनुवाद
**सावनी केळकर**


**आधुनिक महाभारताची विनोदी गाथा...**

*महाभारत आणि रामायण तसे हिंदू धर्माची अस्मितेची प्रतिके. लहानपणापासूनच या साहित्याची ओळख आपआपल्यापरीने प्रत्येक कुटुंबात करून दिले जाते. पण तुमच्या हातात जर हेच महाभारत, त्यातील सर्व पात्रे फक्त आधुनिक व कॉर्पोरेट क्षेत्राशी संबंधित पद्धतीने जुळवून आले तर किती आनंददायी अनुभव असेल नाही का? कॉर्पोक्षेत्र हे पुस्तक म्हणजे एमबीए युगातील महाभारत वाचकांसमोर ठेवते. त्यातून मराठी वाचकांना हे पुस्तक पुराणातील अनुभव देण्यासोबतच आधुनिक दृष्टी देईल. आजच्या काळात महाभारतातील पात्रांशी काही संबंध शोधण्याचा प्रयत्न करेल. कॉर्पोक्षेत्र यातील कथा रंजक शैलीने आणि विनोदी पद्धतीने मांडतानाच युवकांचा विचारप्रवाह बदलू शकेल इतकी सामर्थ्यशाली आहे. महाभारताची ही आधुनिक गाथा मनोवेधक आहे.*

**- *दीपक कुलकर्णी***

**किंमत : १८०/- रु. (ई-बुक स्वरूपातही उपलब्ध)**

पुस्तकपरिचय




'Hidden History'

# दडलेला इतिहास

महायुद्धाचं गुप्त उगमस्थान

**जेरी डॉशेर्टी / जिम मॅकग्रेगर**

अनुवाद
**स्नेहलता जोशी**

## पहिल्या महायुद्धाच्या इतिहासातील सत्य-असत्यतेची मीमांसा

पहिलं महायुद्ध... जागतिक इतिहासातील एक महत्त्वपूर्ण पर्व. पहिल्या महायुद्धाच्या प्रचलित इतिहासाच्या सत्य-असत्यतेचा अभ्यासपूर्ण ऊहापोह करणारं 'Hidden History' पुस्तक लिहिलं आहे जेरी डॉशेर्टी आणि जिम मॅकग्रेकर यांनी. ‘दडलेला इतिहास’ ही या पुस्तकाची मराठी आवृत्ती मेहता पब्लिशिंग हाऊसने प्रकाशित केली आहे. मराठीत अनुवाद केला आहे स्नेहलता जोशी यांनी.

हे पुस्तक पहिल्या महायुद्धास जबाबदार असणाऱ्या लोकांना वैशिष्ट्यपूर्ण रीतीने उजेडात आणते. लंडनमधील धनाढ्य आणि प्रभावशाली अशा व्यक्तींनी अगदी गुप्तपणे एक कंपू करून हेतुत: सिक्रेट सोसायटीची स्थापना केली व त्याद्वारेच मानवतेविरुद्ध घडवून आणलेला अतिशय क्रूर, पाशवी गुन्हा म्हणजे पहिले महायुद्ध. जगापासून आपली गुन्हेगारी लपवून ठेवण्यासाठी या लोकांनी जाणूनबुजून युद्धाच्या उगमांची खोटी व दिशाभूल करणारी कारणे कशी तयार केली व ती खोट्या इतिहासाद्वारे जगासमोर कशी मांडली हे या पुस्तकाने उघड करून दाखविले आहे. (हाच खोटा इतिहास गेल्या शतकभर शाळा-कॉलेजांतून व विद्यापीठांतून शिकविला जातो आहे.)

सीक्रेट सोसायटीच्या सदस्यांना म्हणजे सीक्रेट एलिट्‌सना जगाच्या भूमीचा राहण्यालायक असा इंचन्‌ इंच आपल्या ताब्यात घेऊन जगावर वर्चस्व गाजवायचे होते. हे सर्व पडद्याआड राहून करावयाचे होते. त्यासाठी पहिली पायरी होती– त्यांना व्यापारात, तंत्रज्ञानात व उद्योगात वरचढ ठरून भावी काळात आव्हान देण्याची क्षमता अंगी असलेल्या उदयोन्मुख लोकशाहीवादी जर्मनीची पुरती राखरांगोळी करणे. या विध्वंसासाठी ते तब्बल दहा वर्षे योजना आखत होते. आर्कड्यूक फ्रान्झ फर्डिनंडची हत्या हा काही सहज घडून आलेला प्रकार नव्हता. लंडनमध्ये बसलेल्या या दुष्ट कंपूपासून आज्ञावलीची जी एक शृंखला सुरू झाली होती, ती सेंट पीट्‌सबर्ग व बेलग्रेडमार्गे साराजेव्होपर्यंत दूरवर पोहोचली होती. या शृंखलेमार्फत सुरुंगाची वात पेटविण्याचे काम झाले व ही हत्या ही युद्ध सुरू करणारी पहिली ठिणगी ठरली.

हिडन हिस्ट्रीमध्ये एक खेचून घेणारे आव्हान उभे केले आहे व लेखकद्वयांचे एवढेच सांगणे आहे की, त्यांनी तुमच्यासमोर मांडलेल्या पुराव्यातले सत्य तुम्ही पडताळून पाहावे.

सखोल संशोधनाच्या आधारे लिहिलेलं हे पुस्तक संदर्भग्रंथ म्हणूनही वापरता येऊ शकतं.

◆

पुस्तक परिचय




# काँग्रेस विरुद्ध महाराष्ट्र

प्रल्हाद केशव अत्रे

(ई-बुक स्वरूपातही उपलब्ध)

**अ‍ॅड. बाबूराव कानडे**

## आचार्य अत्रे यांच्या काँग्रेसद्वेषाचे निर्भीड दर्शन

समाजाबद्दल, सर्वसामान्य माणसाबद्दल आचार्य अत्रे यांना खूप कळवळा होता. त्या कळवळ्यातून केवळ समाजकारणाच्या भूमिकेतून त्यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केला; पण काही गोष्टी अशा घडत गेल्या, की त्यांनी काँग्रेसमधून बाहेर पडणं पसंत केलं आणि त्यानंतर त्यांनी आयुष्यभर काँग्रेसविरोधी भूमिका घेतली. विशेषत: यशवंतराव चव्हाण आणि पंडित नेहरू, हे नेहमीच त्यांच्या टीकेचं लक्ष्य ठरले. त्यांच्या या कट्टर काँग्रेसविरोधाचं दर्शन घडविणारं पुस्तक आहे 'काँग्रेस विरुद्ध महाराष्ट्र.' लेखक आहेत ॲड. बाबूराव कानडे.

काँग्रेसमध्ये असताना काँग्रेस पक्षासाठी अत्रे यांनी स्वत:ला झोकून दिले होते. काँग्रेस पक्षासाठी त्यांनी सावरकरांवर टीका केली होती. त्यामुळे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने त्यांच्यावर दोनदा प्राणघातक हल्ला केला होता. तर अशा प्रकारे काँग्रेसमय झालेल्या अत्रे यांना काँग्रेस सोडावी लागली; कारण फाळणीची बीजे दिसू लागली. काँग्रेसचा या फाळणीला पाठिंबा आहे, हे अत्रे यांना सहन झालं नाही आणि ते काँग्रेसमधून बाहेर पडले.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर मात्र आचार्य अत्रे आणि काँग्रेस यांच्यात हाडवैर निर्माण झाले. 'माझी आणि काँग्रेसची फाळणी झाली', असे आचार्य अत्रे वारंवार म्हणत. काँग्रेसचे कट्टर वैरी म्हणून आचार्य अत्रे यांची ख्याती होऊ लागली. काँग्रेसची धोरणे सामान्य माणसासाठी नसून ती फक्त श्रीमंतांसाठी, काळा बाजारवाल्यांसाठी, सटोडियांसाठी, भांडवलदारांसाठी, पुंजीपतींसाठीच आहेत हे त्यांच्या चट्कन लक्षात आले आणि स्वातंत्र्यप्राप्तीअगोदरची काँग्रेसची धोरणे आणि दिलेली आश्वासने यांपासून काँग्रेस अनेक योजने दूर जात असल्याचे आचार्य अत्रे यांच्या लक्षात आले.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर नवी स्वप्ने, नवी धोरणे, नवे जग निर्माण करण्याची; नवा समाज घडविण्याची सर्व स्वप्ने धुळीला मिळाली आणि राज्यकर्ते म्हणून काँग्रेसवर ही सर्व जबाबदारी येते या न्यायाने, त्यात अपयशी ठरलेल्या काँग्रेसला धारेवर धरण्यात आचार्य अत्रे आघाडीवर होते. 'काँग्रेस जनतेची शत्रू आहे, काँग्रेसला मूठमाती द्या, काँग्रेस गाडून टाका', असा नारा आचार्य अत्रे लावीत. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर 'काँग्रेसचे विसर्जन करा'

असे गांधीजी म्हणत, याची सारखी जाणीव अत्रे त्यांच्या भाषणात-लिखाणात करून देत.

स्वातंत्र्यप्राप्तीसाठी अनेक निरनिराळ्या मतांची, संधिसाधू, हवशे, नवशे, गवशे मंडळी जमा झाली. त्या वेळी शिस्तबद्ध, एका विचाराची, एका आचाराची मंडळी असतील, असा गांधीजींचा होरा होता. काळे धंदे करणारे, वाजवीपेक्षा जास्त नफा कमावणारे व्यापारी, साठेबाज यांचा काँग्रेसमध्ये सुळसुळाट झाला. त्यांनाच सत्तेची सर्व पदे देण्यात आली. परमिट राज्य सुरू झाले. म्हणून आचार्य अत्रे यांनी काँग्रेसवर तोफ डागली. नाशिकच्या गोविंदराव देशपांडे यांना 'परमिट गोविंदा' अशी पदवी बहाल केली. सोडा वॉटर फेम बोरकर दादा अशी विशेषणे देऊन नामदार सदोबा पाटील यांचा उल्लेख ना. स. का. पाटील असा येत असे. त्यावर आचार्य अत्रे ना. स. का. पाटील हा शब्द जोडून नासका असा उल्लेख करू लागले.

पुढे संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात तर आचार्य अत्रे यांनी काँग्रेसची दाणादाण उडवून टाकली. तेरा भाषिक राज्यांना मान्यता आणि महाराष्ट्रावर अन्याय, म्हणून संयुक्त महाराष्ट्राचा लढा हा लोकशाहीचा लढा होता. खरेतर देशातील जमीनदार, गिरणीमालक, भांडवलदार आणि गुजरातचे भले करण्यासाठी द्विभाषिक मुंबई, स्वतंत्र मुंबई, केंद्रशासित मुंबई अशी कटकारस्थाने पंडित नेहरू आणि काँग्रेसने रचली होती.

पानशेतचा अहवाल – 'ध' चा 'मा' केलेला, मंत्रालयाच्या कडीकुलपातून पळवून प्रसिद्ध केला. तसेच अझिझुल इस्लाम नावाचा पाकिस्तानी हेर भारतातील गोपनीय माहिती पाकिस्तानला कळवित होता. हे सर्व प्रकरण व सरकारी फाइल पळवून प्रसिद्ध केली आणि सरकारचे बिंग बाहेर फोडले म्हणून वसंतराव नाईकांनी आणि मारोतराव कन्नमवारांनी त्यांना साडेतीन वर्षे तुरुंगात पाठविले. देशभक्तीचे कार्य करणाऱ्या आचार्य अत्रे यांना बेजबाबदार ठरवून तुरुंगात पाठविण्यात आले. असा काँग्रेसने आचार्य अत्रे यांच्यावर सूड घेतला.

आज आपल्याविषयी आणि काँग्रेसविषयी काही आचार्य अत्रे यांनी छापले नाही; म्हणजे आजचा दिवस आपला चांगला गेला, अशी काँग्रेस पुढाऱ्यांची धारणा होती. यशवंतराव आणि पंडित नेहरू यांच्याबद्दल अत्रे यांना एवढी चीड का होती, त्याची कारणमीमांसा या पुस्तकात केली आहे.

यशवंतराव आणि नेहरू यांच्या स्वार्थी, संधिसाधू राजकारणाचे महाराष्ट्रावर काय परिणाम झाले, याचंही विवेचन या पुस्तकात केलं आहे. अत्र्यांच्या वादळी तरीही संवेदनशील व्यक्तिमत्त्वाचं अंतर्बाह्य दर्शन या पुस्तकातून घडतं.

तर, एकूणच हे पुस्तक वाचनीय आहेच आणि संदर्भ ग्रंथ म्हणूनही उपयुक्त आहे.

◆


मेहता पब्लिशिंग हाऊस




टी बुक क्लब


आजच व्हा सदस्य, निम्म्या किंमतीत मिळवा पुस्तकं

* ₹ ५० भरून 'टी बुक क्लब'चे सदस्यत्व.
* दरवर्षी सहा लोकप्रिय पुस्तकांचे अनुवाद निम्म्या किंमतीत
* इतर पुस्तके २०% सवलतीत
* योजनेतील सहाही पुस्तके घेणे बंधनकारक

टी बुक क्लब योजनेतील 'क्लासिक्स'साठी खास सवलत!
₹ १०० भरून 'टी बुक क्लब' यादीतील कोणतीही ८ किंवा
सर्व पुस्तके एकाचवेळी निम्म्या किंमतीत मिळवा. पोस्टेज खर्च अतिरिक्त.

फोन : (०२०) २४४७६९२४ ९४२०५९४६६५
सदस्यत्वासाठी ऑनलाइन लिंक -
www.mehtapublishinghouse.com/memberships.aspx

पुस्तकपरिचय




# आचार्य अत्रे

## बारा गावचं पाणी

लेखक : ॲड. बाबूराव कानडे

**(ई-बुक स्वरूपातही उपलब्ध)**

## आचार्य अत्रे आणि विविध गावं यांच्या नात्याचा वेध...

आचार्य अत्रे म्हणजे महाराष्ट्राचं अष्टपैलू व्यक्तिमत्व. साहित्य, नाटक, चित्रपट, पत्रकारिता, वक्तृत्व, राजकारण, शिक्षण, समाजकारण आदी विविध पैलूंद्वारे त्यांनी आपली वेगळी छाप उमटवली आहे. महाराष्ट्राचे 'सांस्कृतिक राजदूत' अशीच त्यांची ओळख होती. संयुक्त महाराष्ट्राची चळवळ, नाट्य संमेलन, साहित्य संमेलन, व्याख्यानं, चित्रीकरण, नाटकांचे दौरे आदी कारणांमुळे पायाला भिंगरी लावल्यासारखा त्यांनी महाराष्ट्र पिंजून काढला. इतकंच काय; पण देश-परदेशांतही ते अनेकदा गेले. या निमित्त त्यांचा विविध शहरांशी-गावांशी संबंध आला. त्यातून त्यांचे अनेक ठिकाणांशी ऋणानुबंध जुळले. नेमक्या या नात्यांचा वेध ॲड बाबुराव कानडे यांनी 'आचार्य अत्रे - बारा गावचं पाणी' या पुस्तकांद्वारे घेतला आहे. बेळगाव, गोवा, रत्नागिरी, कोल्हापूर, कऱ्हाड, सातारा, वाई, तुळजापूर, पुणे, मुंबई, नगर, औरंगाबाद, नागपूर, दिल्ली आदी शहरांशी आचार्य अत्रे यांचे नातेसंबंध यात उलगडून दाखवण्यात आले आहेत.

'बेळगाव - महाराष्ट्राचे हृदय' या लेखात बेळगावविषयी वाटणारी आत्मीयता आणि जिव्हाळा आहे. सन १९४६ मध्ये तिथं झालेल्या साहित्य संमेलनाद्वारे संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्याचं रणशिंग अत्रे यांनी फुंकलं. 'बेळगाव महाराष्ट्राचे हृदय आहे आणि मुंबई मस्तक आहे,' असं म्हणत एखाद्या शूर शिलेदारासारखं लेखणी आणि वाणीद्वारे आचार्य अत्रे यांनी केलेल्या रोमहर्षक लढ्याचं वर्णन यात आहे. महाराष्ट्राच्या मर्मबंधातली ठेव म्हणून गोव्याला ओळखलं जातं. गोव्यावर अत्रे यांचं नि:स्सीम प्रेम होतं. गोव्याच्या स्वातंत्र्यलढ्यात अत्रे यांनी उडी घेतली. त्यासाठी त्यांची लेखणी 'नवयुग' मधून आग ओकत होती. त्यांच्या वाणीला धार चढली होती. गोव्यासंबंधीच्या त्यांच्या भाषणांचा आणि लेखांचा एक मोठा ग्रंथ होईल, एवढं त्यांचं योगदान आहे. या साऱ्या बाबी गोव्यावरच्या लेखात आहेत.

पुण्याविषयी अत्रे यांना मोठी आत्मीयता होती. नगरसेवकपदापासून ते लोकसभेपर्यंतच्या अनेक निवडणुका अत्रे पुण्यात लढले. भांबुर्डाचं शिवाजीनगर तर रे मार्केटचे महात्मा फुले मार्केट असं नामकरण करण्यात त्यांनी पुढाकार घेतला होता. लोकसभेची निवडणूक पुण्यात ते हरले. त्याचवेळी विधनसभेची निवडणूक ते मुंबईतून जिंकले. त्यावेळी 'आईने मारले; पण मावशीने तारले' असे उद्गार त्यांनी काढले होते. पुण्याविषयी

अशा अनेक आठवणी 'पुणे- माझी आई - सांस्कृतिक कर्मभूमी' या लेखात जागवल्या आहेत. आचार्य अत्रे यांचं कोल्हापूरशी नातं चित्रपटांमुळे आणखी दृढ झालं. 'ब्रह्मचारी', 'वसंतसेना', 'महात्मा फुले' या चित्रपटांसंदर्भातल्या अनेक आठवणी सांगितल्या आहेत. तसंच बाबुराव पेंढारकर, वि. स. खांडेकर, बाबा कदम, शिवाजी सावंत आदींविषयीच्या आठवणींनाही उजाळा 'कोल्हापूर नव्हे कलापूर' या लेखात देण्यात आला आहे.

सासवडमध्ये अत्रे यांचं बालपण गेलं. त्यावेळच्या अनेक आठवणी, गंमतीजमती आहेत. उनाडक्या, चेष्टा, चकाट्या, नकला यांना ऊत आला होता. त्यावर 'शक्ती आणि भक्तीचा संगम - सासवड जन्मभूमी' या लेखात प्रकाश टाकण्यात आला आहे. 'मी लहानसहान मंडळींशी मैत्री करत नसतो. खंडाळ्यांच्या डोंगर आणि मुंबईचा सागर हीच माझी खरी मित्रमंडळी,' असं आचार्य अत्रे म्हणत. त्यामुळंच खंडाळा इथला राजमाची बंगला हे त्यांचं एक आवडतं ठिकाण होतं. इथं रंगलेल्या मैफली, नवोदित साहित्यकांचा मेळा, मान्यवरांच्या गाठीभेटी यामुळं हा बंगला अत्रे यांच्या जीवनात उत्साहाचा झरा होता. एका बंगल्याविषयीच्या आठवणी खूप रंजक झाल्या आहेत.

आचार्य अत्रे यांचे अभ्यासक अशी ॲड. कानडे यांची ओळख आहे. खरं तर आचार्य अत्रे यांना ते आपलं दैवतच मानतात. त्याच अनुषंगानं त्यांनी हा लेखनप्रपंच केला आहे. अत्रे यांचा अनेक गावांशी - शहरांशी ऋणानुबंध जुळला. तिथल्या आठवणींना कानडे यांनी एका धाग्यात गुंफलं आहे, हा अतिशय स्तुत्य प्रयोग आहे. खरं तर ही गावंच आचार्य अत्रे यांच्या आठवणी सांगत आहेत, असा भास आपल्याला होतो, इतकं प्रत्ययकारी लेखन कानडे यांनी केलं आहे. मात्र, हे करत असताना आचार्य अत्रे यांच्याशी ज्यांचे वादविवाद झाले, त्यांनाही कानडे यांनी झोडपून काढलं आहे. अत्रे यांच्या नजरेतून त्यांनी पाहिलं असल्यामुळं हे झालं असावं, असं वाटतं. मात्र, त्यांनी हे टाळायला हवं होतं, असं वाटतं. अत्रे यांच्यावर प्रेम करणाऱ्यांनी तर हे पुस्तक वाचावंच, शिवाय ज्यांना महाराष्ट्राची सांस्कृतिक चळवळ, संयुक्त महाराष्ट्र यांविषयी आत्मीयता आहे, त्यांनीही हे पुस्तक आवर्जून वाचलं पाहिजे. अत्रे यांच्या अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाची ओळख आपल्याला या पुस्तकातून निश्चित होते, एवढं नक्की!

**– सु. ल. खुटवड**

**साप्ताहिक सकाळ (२३-०२-२०२०)**

◆


**बच्चेकंपनीसाठी संपूर्ण सचित्रं पुस्तके**

# जादूमंतर छू

## आणि
## इतर कथा

**शंकर सारडा**

**किंमत : १९५/- रु.**





मुलांचं भावविश्व अनेक जादुई गोष्टींनी भारलेलं असतं. या भावविश्वाचं प्रतिबिंब या अफलातून कथांमधून टिपलेलं आहे. जादूगारांच्या आणि विस्मयकारक कल्पकतेच्या या गोष्टी वाचन न आवडणाऱ्या मुलांनाही आकर्षित करणाऱ्या आहेत.

# मर्कटराजा

## आणि
## इतर कथा


**शंकर सारडा**




**किंमत : १९५/- रु.**

शक्तिमान आणि अक्कडबाज मर्कटराजा धमाल करामती करतो. त्याच्या या करामती म्हणजे बालसुलभ मनाला गुंतवून ठेवणारा धमाल ठेवा. त्याच्या छोट्या छोट्या क्लृप्त्या आणि लीला अद्भुत कल्पनाविश्व साकारतात आणि त्यात तुम्ही हरवून जाता.

पुस्तकपरिचय




# प्रतिभेचा इंद्रधनू

**जोना लेहरर**

अनुवाद
**डॉ. अजेय हर्डीकर**

## सर्जनशीलतेचं वैज्ञानिक विश्लेषण

सर्जनशीलता किंवा प्रतिभा... मग ती विज्ञानाच्या क्षेत्रातील असेल, साहित्याच्या किंवा अन्य कुठल्याही क्षेत्रातील असेल, ती प्रतिभा ही शक्ती अतींद्रिय आहे, ती शास्त्रज्ञ, कलावंत इ. मोजक्या लोकांकडेच असते, असा एक समज आहे; पण 'इमॅजिन' हे पुस्तक हा समज दूर करतं. हे पुस्तक लिहिलं आहे जोना लेहरर यांनी आणि 'प्रतिभेचा इंद्रधनू' या शीर्षकासह अनुवाद केला आहे डॉ. अजेय हर्डीकर यांनी. या पुस्तकातून प्रतिभेचा विज्ञानाच्या दृष्टीतून वेध घेतला गेला आहे.

मानवी मनाच्या 'ऑपरेटिंग सिस्टम'मध्ये 'क्रिएटिव्ह इम्पल्स' अंतर्भूत आहेच. कोणत्याही क्षणी मेंदू आपला आपणच नवी 'असोसिएशन्स' निर्माण करत असतो आणि दैनंदिन 'क्ष'चं अनपेक्षित 'य'शी नातं जोडत असतो. हे कसं होतं, याचा उलगडा हे पुस्तक करतं. कल्पना कशा सुचतात, त्याचं विश्लेषण सदर पुस्तकातून केलं गेलं आहे.

कित्येकदा नवनिर्मितीच्या प्रक्रियेला अनेकांचा हातभार लागतो. त्यामुळे 'टीम' मध्ये योग्य प्रकारे काम कसं करावं, हेही माहीत असणं आवश्यक आहे. पुस्तकाच्या पहिल्या भागात वैयक्तिक पातळीवर आढळणाऱ्या क्रिएटिव्हिटीचा ऊहापोह केला आहे. लोक एकत्र आले तर - मग ते रस्त्यांवर असोत किंवा ऑफिसच्या लॉबीत असोत - काय काय घडू शकतं, या सर्वांचं दुसऱ्या भागात वर्णन केलं आहे. या विषयात अतिशय रंजक संशोधन झालं आहे; चालू आहे. ब्रॉडवेमधील हजारो संगीत नाटकांचा अभ्यास करून, माणसं जिथं जिथं एकत्र येतात, तिथल्या परिस्थितीचं विश्लेषण केलं गेल्यामुळे काही कंपन्या किंवा टीम्स अधिक सर्जनशील का असतात, हे आता थोडं कळू लागलंय. त्यांचं यश हा अपघात नसतो.

मानवी इतिहासाकडे पाहिलं, तर बहुतेक काळांत कल्पकतेला दैवी देणगीच मानलं गेलं आहे. या पार्श्वभूमीमुळे तिच्याबद्दल अनेक गैरसमज आजही आहेत. या गैरसमजांमुळे दिशाभूल होते; इतकंच नाही, तर कल्पनाशक्तीलाही त्यामुळे अडथळा निर्माण होतो. या पुस्तकातून काही सुबक वैज्ञानिक प्रयोग आणि अभ्यासांकडे लक्ष वेधलं आहे. शिवाय वास्तव जगात क्रिएटिव्हिटीचे पडसाद कसे उमटतात,त्यावरही दृष्टिक्षेप टाकला आहे. बॉब डिलनची लिखाणाची पद्धत आणि कवींच्या अमली पदार्थांच्या


सवयींबद्दल लिहिलं आहे. रसायनशास्त्रज्ञासारखा विचार करणारा बार टेंडर, ऑटिस्टिक असलेला भन्नाट सर्फर यांची भेट या पुस्तकाद्वारे होते. अशक्यप्राय वाटणाऱ्या समस्या सोडविणारी वेबसाईट आणि पिक्सार स्टुडिओजच्या पडद्यामागच्या गमती याकडेही लक्ष वेधलं आहे. यो-यो मा 'इम्प्रूव्हाइज' कसं करतो आणि सतत नवनवीन कल्पनांना वास्तवात आणणाऱ्या कंपन्यांचं गुपित काय, याचंही विवेचन या पुस्तकात केलं आहे. न्यूरॉन ते घासूनपुसून तयार झालेली सिम्फनी आणि मेंदूतलं सर्किट ते एखादं यशस्वी प्रॉडक्ट – यादरम्यान असलेले असंख्य पदर या पुस्तकातून उलगडून दाखवले आहेत.

◆



# छत्रपती संभाजी
## एक चिकित्सा


**डॉ. जयसिंगराव पवार**




**किंमत : १८०/- रु.**
**(ई-बुक स्वरूपातही उपलब्ध)**

''छत्रपती संभाजी हा एक रंगेल, बेजबाबदार, क्रूर राजा (युवराज) होता, असं चित्र काही ऐतिहासिक कागदपत्रांमुळे निर्माण झालं, पण त्या कागदपत्रांची शहानिशा करण्याचं काम इतिहासकारांनी केलं नाही. परिणामी, संभाजीराजांची मलीन प्रतिमा साहित्यिक, सर्वसामान्यांपर्यंत पोहोचली, पण काही मोजक्या इतिहास संशोधकांनी योग्य कागदपत्रांचा शोध घेऊन, उपलब्ध पुराव्यांची शहानिशा करून संभाजीराजांच्या व्यक्तिमत्त्वातील गुणविशेष अधोरेखित करण्याचा प्रयत्न केला. संभाजीराजांची विपरीत प्रतिमा निर्माण करणारी कागदपत्रं, संशोधकांनी त्याची केलेली चिकित्सा आणि संभाजीराजांचे गुणविशेष अधोरेखित करणारी कागदपत्रं, यांचा सम्यक आढावा घेणारं पुस्तक म्हणजे... 'छत्रपती संभाजी : एक चिकित्सा.' संभाजीराजांची विपरित प्रतिमा निर्माण करणाऱ्या विविध ऐतिहासिक साधनांचा आढावा या पुस्तकांतून घेतला गेला आहे. संभाजीराजे मोगलांना जाऊन मिळाले होते. त्याचं कारण काही ऐतिहासिक कागदपत्रांत असं सांगितलं गेलं आहे, की एका ब्राम्हणकन्येवर संभाजीराजे फिदा झाले होते. तिच्याशी त्यांचे अनैतिक संबंध होते. शिवाजी महाराजांना हे समजल्यावर ते संतापले. आता ते आपल्याला कडक शिक्षा देतील असं संभाजीराजांना वाटलं. म्हणून ते मोगलांना जाऊन मिळाले. काहींच्या मते रायगडावर हळदी-कुंकवासाठी आलेल्या एका ब्राम्हण युवतीवर संभाजीराजांनी बलात्कार केला. त्याबद्दल शिवाजी महाराज त्यांना कडक शासन करतील म्हणून ते मोगलांना जाऊन मिळाले. आपली चूक उमगल्यावर ते स्वराज्यात परत आले. त्यांची आणि शिवाजी महाराजांची दिलजमाई झाली, पण संभाजीराजे मोगलांकडून परत आल्यानंतर शिवाजी महाराजांच्या आणि त्यांच्या भेटीचंही काही इतिहासकारांनी विपर्यस्त वर्णन केलं. त्यानंतर थोड्याच अवधीत शिवाजी महाराजांचा मृत्यू झाला. संभाजीराजांनी त्यांच्यावर विषप्रयोग केला, असाही एक आरोप संभाजीराजांवर केला गेलेला काही कागदपत्रांत आढळतो.

पुस्तक परिचय




# आहे कट्टर तरी...

**तहमिमा अनम**

अनुवाद
**भारती पांडे**

## धार्मिक - अधार्मिकाच्या परिघावरील गोष्ट...

धर्ममूलतत्त्ववादावरून एखादं युद्ध छेडलं जातं. बांगलादेशमध्येही असं युद्ध छेडलं गेलं. या युद्धात कोणत्या ना कोणत्या प्रकारे सहभागी असलेल्या एका कुटुंबात वादळ उठलं. या वादळाची कहाणी म्हणजे तहमिमा अनम लिखित 'द गुड मुस्लिम' ही कादंबरी. या कादंबरीचा मराठीत अनुवाद केला आहे भारती पांडे यांनी. मराठी शीर्षक आहे, 'आहे कट्टर तरी...'

सोहेलच्या कुटुंबाची ही कहाणी आहे. सोहेलच्या सर्वच कुटुंबीयांनी या स्वातंत्र्ययुद्धात काही ना काही सहभाग घेतला आहे. त्याची बहीण माया डॉक्टर आहे. ती खेड्यात युद्धपीडित महिलांवर उपचार करण्यात जवळ जवळ एक दशक घालवते. तेथील महिलांवरील अत्याचार पाहून अचानक तिला एका दशकानंतर घरी परतावेसे वाटते. ती घरी परत येते. युद्धपरिस्थितीनंतर तिचा लाडका भाऊ पार बदलून गेलेला तिला आढळतो. माया अजूनही तिच्या क्रांतिकारक आदर्शांशी बांधलेली आहे, तर सोहेलनं आपलं पूर्वीचं आयुष्य साफ सोडून दिलं आहे आणि आता तो एक परिणामकारक असा धार्मिक नेता बनलेला आहे.

पिया (ही युद्धपीडित गर्भवती महिला काही काळ सोहेलच्या संपर्कात आलेली असते. सोहेलने तिला आश्रय दिलेला असतो आणि तिच्याशी लग्न करायची तयारीही दर्शवलेली असते.) निघून गेल्यावर सोहेलने, युद्धात नवरा मारला गेलेल्या सिल्व्हीशी आता लग्न केले आहे. तिने तिच्या धार्मिक गोष्टींचा सोहेलवर पूर्ण प्रभाव पाडला आहे. घराच्या वरच्या मजल्यावर पूर्ण तिचा आणि तिच्या धार्मिक शिष्यगणांचा आता ताबा आहे. तिच्यापासून झालेल्या सोहेलच्या झैदी या छोट्या मुलावरही या कडव्या धर्मांधतेचा अंमल आहे.

सिल्व्हीचा अचानक मृत्यू झाल्यावर सोहेलही आपल्या मुलाला मदरसामध्ये शिकायला पाठवण्याचा निर्णय घेतो आणि हे पाहून माया हबकून जाते. तिला त्याला शाळेत घालायचे आहे; पण सोहेलला ते मान्य नाही. त्या दोघांमधला संघर्ष पराकोटीला पोहोचतो. सोहेल झैदीला लांबच्या मदरशामध्ये पाठवतो. तेथील वातावरण संशयास्पद आहे, असे मायाला वाटते. तेथून झैदी एकदा पळून येतो; परंतु सोहेल त्याला पुन्हा पाठवून देतो. झैदीने तिथल्या हुझुरांच्या तेथील मुलांवरील अत्याचाराविषयी मायाला

ओझरते सांगितले आहे.

दरम्यान, मायाची आई कॅन्सरग्रस्त झाली आहे. भाऊ आपल्याच धर्मांधतेत बुडून गेला असल्याने मायालाच आपल्या अम्मूकडे बघावे लागतेय. ती आपल्या जुन्या मित्र-मैत्रिणींना भेटते. त्यातच तिची छोटी पत्रके चालवणाऱ्या शफात व अदितीशी ओळख होते. ती त्यांच्या पत्रकातून हुकूमशहांच्या वास्तव गोष्टींविरुद्ध काही लेख लिहिते. युद्धात भाग घेतलेला व आपल्या भावाला युद्धातच गमावलेला जॉय हा सोहेलचा अगदी जवळचा मित्र तिला पुन्हा भेटतो. त्याला तिच्याशी लग्न करायचे आहे; पण झैदविषयी व अम्मूविषयी चिंतित असलेली माया निर्णय घेऊ शकत नाही. मनाशी काही ठाम ठरवून ती झैदला मदरशामधून सोडवून आणायला जाते.

काय होते झैदचे... माया जॉयशी लग्न करते का... अम्मूचे काय होते...

'द गुड मुस्लिम' ही कादंबरी श्रद्धा, कुटुंब आणि युद्धाची गडद सावली याविषयी बोलते. ती मुळातून वाचली पाहिजे. भारती पांडे यांचा अनुवाद नेहमीप्रमाणेच उत्तम.


◆


**राहा स्वस्थ... जगा मस्त...**

**निरोगी जीवनाचा मार्ग निरोगी मनातून जातो.**
**आणि हे निरोगी तन, निरोगी मन बहाल करणारा राजमार्ग म्हणजे योग...**
**भारतानं सबंध जगाला हा आरोग्याचा मूलमंत्र दिला आहे...**
**सध्याच्या कोरोनारुपी संकटाच्या काळात तर योगाचं महत्त्व आणखी अधोरेखित झालं आहे...**
**तेव्हा वेळीच योगाचं महत्त्व ओळखा आणि दिवसातला किमान काही मिनिटे आपल्या आरोग्यासाठी खर्च करा...**

# चाणाक्ष


**बाबू गंजेवार**




*अनासक्ती, अफाट व्यासंग, चाणाक्ष बुद्धिमत्ता, धोरणी राजकारण, इतक्या सर्व सद्गुणांचा समुच्चय एका चाणक्य नावाच्या व्यक्तीत झाला आहे. धूर्त व यशस्वी राजकारणी असून देखील चाणक्याला राजपदाचा मोह नव्हता. राजसत्तेच्या वैभवाला निर्मोही वैराग्याची जोड असणे, हा आदर्श आर्य संस्कृतीचा विचार चाणक्यामुळे दृढ झाला. वर्तमान जगताला आजदेखील या परंपरेची नितांत आवश्यकता भासत आहे, हे आमान्य करून चालणार नाही. सामान्यत: फारसा परिचित नसलेला हा एका महानायकाचा इतिहास कथास्वरूपात या कादंबरीत मांडण्याचा प्रयत्न केला आहे.*

**किंमत : ३९५/- रु. (ई-बुक स्वरूपातही उपलब्ध)**

पुस्तक परिचय




# झुबेदा

**तहमिमा अनम**

अनुवाद
**सरिता आठवले**

## झुबेदाच्या आत्मशोधाची व्यामिश्र कहाणी

झुबेदा - बांगलादेशच्या स्वातंत्र्ययुद्धात मोलाची कामगिरी केलेल्या, एका लब्धप्रतिष्ठित जोडप्याची दत्तक मुलगी. आपल्या जन्मदात्यांची पाळेमुळे जाणून घेण्याचा पराकोटीचा ध्यास घेऊन आत्मशोधाच्या प्रवासाला निघालेल्या झुबेदाची ही कहाणी. झुबेदाची हार्वर्ड युनिव्हर्सिटीत जीवशास्त्राचे शिक्षण घेताना मुक्त जीवनशैलीशी ओळख होते. इथेच तिची एलिजाशी गाठ पडते. तिच्या प्राणप्रिय एलिजाला, तिच्या या आत्मशोधाच्या प्रवासाची कहाणी तिने 'द बोन्स ऑफ ग्रेस' या प्रदीर्घ पत्रातून सांगितली आहे. या प्रदीर्घ पत्राचा मराठीत अनुवाद केला आहे सरिता आठवले यांनी. मराठी अनुवादाचं शीर्षक आहे 'झुबेदा.' झुबेदाच्या या पत्रकहाणीत एक व्हेल, एक जहाज, एक पियानो, भरकटलेला पण भानावर आलेला प्रियकर आणि त्याची हतबल झालेली प्रेयसी यांच्या व्यथांचाही गुंता आहे.

अमेरिकेची आधुनिक आणि बांगलादेशाची परंपरावादी संस्कृती यांच्या संघर्षात भांबावून गेलेल्या प्रतिष्ठित घराण्यातील दत्तक मुलगी असलेल्या झुबेदाला एलिजाच्या संपन्न अमेरिकन वंशवृक्षाचे अप्रूप वाटते. शिक्षणाच्या दरम्यान तिला पाकिस्तानात एका जीवाश्माच्या उत्खननाची संधी मिळते. काही अकल्पित घटनांमुळे हे उत्खनन अर्धवट टाकून तिला मायदेशी परतावे लागते. या अयशस्वी मोहिमेनंतरच्या निराश मन:स्थितीत कुटुंबाच्या दबावाखाली ती बालमित्राशी - रशीदशी लग्न करते. या सगळ्या घडामोडींमुळे तिचे खरेखुरे प्रेम तिला विसरून जावे लागते. पण स्वत:चे वादग्रस्त जन्मरहस्य उलगडताना सासरच्या ख्यातनाम घराण्याची प्रतिष्ठाही तिला पारखी होते.

घरच्या भुकेल्या तोंडात चार घास घालण्यासाठी, नौकाविखंडनाचे खडतर, प्रसंगी जिवावर बेतणारे काम, नाइलाजाने काम पत्करणाऱ्या अशिक्षित मजुरांपैकी अन्वर, अचानकच झुबेदाच्या जीवनात येऊन ठेपतो आणि तोच तिच्या घराण्याचा शोध घेण्यात महत्त्वाचा दुवा ठरतो. पण नशिबाच्या फेऱ्यात सगळेच अडकतात – झुबेदा, रशीद, एलिजा, अन्वर, मो आणि शोना. झुबेदाच्या जन्मरहस्याच्या धाग्यादोऱ्यांची गुंफण म्हणजे 'द बोन्स ऑफ ग्रेस.'

ग्रेस हे पंचतारांकित जहाज व झुबेदाचे सुखवस्तू आणि प्रतिष्ठित

आयुष्य यांच्यातील साम्यस्थळे तहमिमा अनमच्या रचनाकौशल्याने, प्रकर्षाने जाणवतात. कॅप्टनची आत्महत्या आणि जहाजावर झालेला साथीच्या रोगाचा उद्रेक यामुळे ग्रेसला विखंडनाच्या निर्णयाला सामोरे जावे लागते. दिमाखदार ग्रेसचे वैभव दर दिवसागणिक ओरबाडले जात असताना अमेरिका आणि बांगलादेशातील सांस्कृतिक तफावत झुबेदाला न परतीच्या एकाकी वाटेवर नेऊन सोडते. झुबेदा, एलिजाविषयी वाटणाऱ्या वेड्या प्रेमात स्वत:ला झोकून देते आणि आपल्या जन्मदात्या आई-वडिलांच्या शोधात एलिजाचे भावुक प्रेम आणि रशीदची जन्मभराची साथही गमावते.


कादंबरीच्या भाषेचा आत्मकेंद्रित स्वर नायिकेच्या चढेल व्यक्तिमत्त्वाशी सुसंगत वाटतो आणि त्यामुळेच तिच्या जन्मदात्रीच्या, जुळ्या बहिणीच्या व बहिणीच्या प्रियकराच्या - अन्वरच्या विकल आयुष्यांची कहाणीही अधिकच भेसूर वाटू लागते. अमेरिकेतील मुक्त जीवन, आशियातील दहशतवाद आणि बांगलादेशातील सामाजिक असमतोलाचे यथार्थ वर्णन करण्यात तहमिमा अनम कमालीच्या यशस्वी झाल्या आहेत. कादंबरीची कथा उलगडत जाताना, पेरलेले अनेक धागेदोरे शेवटी सुसूत्रपणे गुंफण्याचे अप्रतिम कौशल्य लेखिकेला साधले आहे. चार-सहा वाक्यांत सामावलेल्या या कथावस्तूचा व्यापक आविष्कार तहमिमा अनमच्या भाषेच्या सक्षम हाताळणीने नटला आहे. त्यामुळेच 'द बोन्स ऑफ ग्रेस' अर्थात 'झुबेदा' ही प्रदीर्घ कादंबरी वाचनीय ठरते.

◆

**मेहता पब्लिशिंग हाऊस च्या अधिकृत इंस्टाग्राम हॅन्डल ला नक्की फॉलो करा...**

अभिप्राय

# मुक्त विहंग : चीनच्या तीन कन्या




**युंग चँग**

अनुवाद

**डॉ. विजया बापट**

ही कहाणी आहे हिंसाचार, अमानुष छळ, अनन्वित अत्याचार आणि जुलमी व्यवस्था यांच्या काळ्याकुट्ट गर्तेमध्ये सौंदर्याची आस धरणाऱ्या, नवनिर्मितीचा आणि आधुनिकतेचा ध्यास घेणाऱ्या स्त्रियांची, त्यांच्या आयुष्याची. या कहाणीला पार्श्वभूमी आहे चीनमधल्या राजकीय, सामाजिक स्थित्यंतरांची, बदलांची. यात क्रांतीमुळे चिनी जनतेच्या आयुष्यावर झालेले परिणाम आहेत; श्रीमंत-गरीब लोकांचं जीवन आहे; समाजजीवनातल्या कथा, मिथकं, चालीरीती यांचे संदर्भ आहेत; आदर्शवादाने भारलेले आणि तो आदर्शवाद फोल ठरल्यानंतर कोसळून गेलेले स्त्री-पुरुषही आहेत. ही कहाणी चीनच्या इतिहासातील एक व्यापक कालखंड तपशीलवारपणे डोळ्यांसमोर उभा करून आपल्याला अंतर्मुख करते.

**किंमत : ६००/- रु.**

## आरसा चीनचा

लेखिका युंग चँग चीनमधल्या सेशुआन प्रांतातल्या या बीन शहरात १९५२ मध्ये जन्मली. सरकारी आज्ञेनुसार शेतात तसेच कारखान्यात काम करत असताना सुरुवातीला चोरुनमारुन आणि नंतर उघडपणे ती इंग्रजी शिकली. नंतर सरकारच्याच एका शिष्यवृत्तीचा आधार घेऊन ती आणखी शिकण्यासाठी १९७८ साली इंग्लडला गेली. तिथे तिने यॉर्क विद्यापीठातून भाषाशास्त्राची पी.एच.डी. मिळवली. ब्रिटिश विद्यापीठातून डॉक्टरेट मिळविणारी ती पहिली चिनी विद्यार्थीनी. एक स्त्री, तिची मुलगी आणि तिची नात या तीन पिढ्यांच्या प्रतिनिधींची ही कहाणी म्हणजे तेवढ्या वर्षांचा चीनचा राजकीय, सामाजिक इतिहासच आहे, पण तो इतिहासाच्या पटलावर कधीही न दिसणारा. गेल्या काही वर्षात चीनमधल्या जुलमी राजवटीच्या अमानुष छळाच्या, अत्याचारांच्या कहाण्या सांगणारी इतरही पुस्तकं प्रसिद्ध झाली आहेत. त्यातली काही चिनी माणसांनीच लिहिली आहेत, पण त्या सगळ्यांपेक्षा या पुस्तकाचं वेगळेपण म्हणजे, हे आई, मुलगी आणि नात अशा एकाच घरातल्या पिढ्यांची कहाणी सांगतं. मुख्य म्हणजे या पुस्तकावर चीनमध्ये बंदी आहे. चीनमध्ये त्या काळात असलेल्या हजारो कानकुबाईन्सपैकी एकीच्या आयुष्यापासून (कानकुबाईन्स अंगवस्त्र) सुरू झालेलं हे पुस्तक तिच्याच इंग्लंडमध्ये राहणाऱ्या, स्वतंत्र, निर्भय आयुष्य जगणाऱ्या नातीच्या आयुष्यापाशी येऊन संपतं. या तीन पिढ्यांच्या दरम्यान हेलकावत राहिलेली अनेक आयुष्य या पुस्तकातून भेटत राहतात. राजसत्तेचा, तिच्याशी संबंधित सगळ्या यंत्रणेचा जुलूम-जबरदस्ती, त्यानंतर माओच्या लहरीनुसार बदलत गेलेलं सगळ्या देशाचं जगणं, सत्तावर्तुळातल्या त्याच्यानंतरच्या उतरंडीतल्या लोकांचं वागणं, या सगळ्यामध्ये दडपली गेलेली चिनची जनता, हे सगळं जसजसं आपण वाचत जातो तसतसा एक मोठा आलेख आपल्यासमोर उभा राहतो. चिनी विक्षिप्तपणाचे, अमानुषपणाचे एकच उदाहरण या पुस्तकानं मांडलेलं दाहक वास्तव देण्यासाठी पुरेसं आहे. 'माओच्या राज्यात इंग्रजीचा आभ्यास' या प्रकरणात लेखिका लिहिते, एका कापडाच्या गिरणीला आग लागली. सरकारी मालमत्ता वाचवण्याच्या प्रयत्नात एक विणकर मुलगी गंभीर जखमी

झाली. तिचे हातपाय कापावे लागले. पण तिचा चेहरा आणि बाकी शरीर मात्र नीट राहिलं. पक्षाने तिची इच्छा विचारली. तिला एखाद्या लष्करी अधिकाऱ्याशी लग्न करायचं होतं. लष्करातल्या वरिष्ठ अधिकाऱ्याने लेखिकेच्या लष्करात असलेल्या भावाला तिच्याशी लग्न करायला सांगितलं. त्याचं म्हणणं होतं, त्या मुलीचं शरीर धड होतं आणि त्यामुळे ती मुलांना जन्म द्यायला सक्षम होती, म्हणून तिच्याशी लग्न केलं जावं. तिचे हात-पाय जाऊन ती अपंग झाल्याची करूणा वाटण्यापेक्षा ती मुलांना जन्म द्यायला सक्षम आहे असा विचार करणं आणि तो प्रत्यक्षात आणणं हे अंगावर काटा आणणारंच आहे. दर बदलत्या राजवटीमध्ये चीनमध्ये थोड्याफार फरकाने सामान्य माणसाच्या, स्त्रियांच्या वाट्याला चिरडलं जाण्याखेरीज दुसरं काहीच आलेलं नाही, हे आपल्या अगदी शेजारी असलेल्या चीनचं दाहक वास्तव आपल्या मनावर ओरखडे उमटवत राहतं, पण त्याबरोबरच चिनी समाजाची अशी अनेक अंग, वेगवेगळ्या सामाजिक प्रथा-कुप्रथा, चालीरीती, मिथकं या सगळ्यांच दर्शन या पुस्तकातून घडतं.

**लोकप्रभा (२५.१२.२०१५)**

◆


**पुस्तक आणि कॉपीराईट यांचे बेकायदा PDF-Books चे प्रसारण सोशल मिडियाच्या माध्यमातून करतात...**

**हक्काने त्या सर्व लोकांना हे बोधचिन्ह पाठवा**


**आणि कळत अथवा नकळत**

**ते करत असलेल्या गुन्ह्याची जाणीव करून द्या.**



# शिवपुत्र राजाराम


**डॉ. प्रमिला जरग**




*मराठ्यांच्या राष्ट्रजीवनातील अत्यंत कठीण अशा काळात अकरा वर्षं नेतृत्व करणाऱ्या छत्रपती राजारामांची चरितकहाणी आहे, 'शिवपुत्र राजाराम'. मराठी सरदार आणि मुत्सद्दी यांना एकत्र आणून बलाढ्य अशा मोगल साम्राज्याला टक्कर देण्यासाठी प्रेरित करणाऱ्या, त्यांच्या शौर्याला, आक्रमक वृत्तीला पूर्ण स्वातंत्र्य देणाऱ्या, उत्तरेपासून दक्षिणेपर्यंत, पश्चिमेपासून पूर्वेपर्यंत मराठी वीरांनी उभारलेल्या प्रखर स्वातंत्र्यलढ्याचं नेतृत्व करणाऱ्या राजराम महाराजांची तेजस्वी जीवनगाथा.*

**किंमत : ५९५/- रु. (ई-बुक स्वरूपातही उपलब्ध)**

# द मॅजिक ऑफ थिंकिंग सक्सेस




**डॉ. डेव्हिड जे. श्वार्त्झ**

अनुवाद
**प्रशांत तळणीकर**

*द मॅजिक ऑफ थिंकिंग सक्सेस हे पुस्तक एका स्वप्नापासून सुरू होते. तुम्हाला आयुष्यात काय हवे आहे, या प्रश्नापासून सुरू होणारा हा प्रवास ते साध्य करण्याच्या विविध पातळ्यांपर्यंत येऊन पोचतो. आरोग्य, संपत्ती आणि समाधान मिळविण्याच्या संगतवार पायऱ्यांचा हा खरा मार्गदर्शक आहे. जो हमखास यशप्राप्तीची खात्री देतो.*

**किंमत : २९५/- रु. (ई-बुक स्वरूपातही उपलब्ध)**

## विश्वास पाटील लिखित



# गाभुळलेल्या चंद्रबनात


पुनवेच्या राती सोन्याचा मुंगूस
झाडावरच्या टिटवीनं गिळला!

बाकेरावसारखा कलावंत म्हणजे
नवकोट मोत्याचा तुरा!

रंगकली होती स्वत:चंच
नवं आभाळ निर्माण करणारी
शापित अप्सरा!

जत्रा पुन्हा पुन्हा भरतील, खेळही रंगतील;
पण अशा अभिजात लोककलावंतांना
शोधायला कुठल्या स्वर्गाची शिडी
चढायची रसिकांनी?

फिरत्या चाकावरच्या रंगफडात फुललेली
बेमिसाल प्रेमकहाणी!
**'गाभुळलेल्या चंद्रबनात'**.




*बाकेरावच्या आणि गगनरावचा नामवंत फड... बाकेराव एक गुणी तमाशा कलावंत... त्याच्या जीवनात चाळिसाव्या वर्षी रंगकली नावाची सोळा-सतरा वर्षांची कलावती येते... दोघं एकमेकांच्या कलेवर लुब्ध होतात... विवाहाच्या बंधनात अडकतात... दोघांचंही कलाजीवन बहरतं... पण एका मोहाच्या क्षणी रंगकलीचा पाय घसरतो... बाकेराव तिचा तिरस्कार करायला लागतो... रंगकली गर्भवती असताना फड सोडून निघून जात... बाकेराव-गगनरावाचा वाद विकोपाला जाऊन फड मोडतो... पुढे काय होतं हे जाणून घेण्यासाठी 'गाभुळलेल्या चंद्रबनात' वाचायलाच हवं... तमाशा कलावंतांची कला आणि त्यांचं जीवन यांच्या एकमेकांत गुंफलेल्या धाग्यांचं वास्तव चित्रण*

**किंमत : ३९५/- रु. (ई-बुक स्वरूपातही उपलब्ध)**

# हिलरी क्लिंटन

**अतुल कहाते**




*‘हिलरी क्लिंटन’ ही आहे हिलरीची संघर्षगाथा, तिच्या व्यक्तिगत आणि व्यावसायिक जीवनाची. माजी राष्ट्रपती बिल क्लिंटनची पत्नी... सिनेटर पद आणि परराष्ट्र मंत्री पदासह विविध पदे भूषवलेली... विविध पुरस्कार लाभलेली... दोनदा राष्ट्रपती पदाची उमेदवार ठरलेली... मुलगी, पत्नी, आई आणि प्रसारमाध्यमांच्या टीकेकडे दुर्लक्ष करून स्वतःला सिद्ध करू पाहाणारी एक स्त्री. ही प्रत्येक भूमिका मनापसून जगणाऱ्या हिलरीचा प्रेरणादायक जीवनप्रवास.*

**किंमत : २७०/- रु. (ई-बुक स्वरूपातही उपलब्ध)**




कोरोना काळात विलगीकरण किंवा संस्थात्मक क्वाराटाईनचा काळ कसा व्यतीत करायचा हा प्रश्नच आहे. अगदी तोकड्या साहित्यनिशी घर सोडलेल्या या लोकांना आता पुस्तकांची साथ लाभणार आहे. कोल्हापूर येथील विलगीकरणात ठेवलेल्या लोकांना मेहता बुक सेलर्सच्या अनिल मेहता यांनी खास शंभर पुस्तकांची भेट दिली आहे. पोलीस उपअधीक्षक डॉ. प्रशांत अमृतकर यांच्याकडे ही भेट पुस्तके सुपूर्द करण्यात आली.


लॉकडाउनचा काळ म्हणजे सक्तीचं घरी बसणं. या सक्तीच्या घरी बसण्याला पुस्तकांच्या सोबतीने सुसह्य केलं आहे. अनेक जण आपलं पुस्तकाचं कपाट पुन्हा शोधताहेत, त्यातलं आवडीचं पुस्तक काढून पुन्हा वाचताहेत. आणि अगदी पूर्वी वाचलेली पुस्तकही पुन्हा पुन्हा वाचताहेत. पण विलगीकरण किंवा संस्थात्मक क्वाराटाईनमध्ये असलेल्या लोकांना मात्र हा आनंद घेता येत नाही. विलगीकरणासाठी अगदी मोजक साहित्य घेऊन बाहेर पडावं लागतं. त्यामुळं सोबत पुस्तकं घेण्याचा प्रश्नच येत नाही. त्यामुळे अशा व्यक्तींना वेळ घालवण्यासाठी माध्यमच नसतं. त्यातून त्यांचं मनोधैर्यही खचू शकतं, हाच विचार करत मेहता बुक सेलर्सच्या श्री. अनिल मेहता यांनी कोल्हापूर येथील विलगीकरणं कक्षात ठेवलेल्या व्यक्तींना शंभर पुस्तके भेट दिली आहेत, यात लोकप्रिय कथा कादंबऱ्यांसोबत मानसिक स्वास्थ्यासाठी उपयुक्त पुस्तकांचा समावेश आहे. आज पोलीस उपअधीक्षक डॉ. प्रशांत अमृतकर यांच्या कडे ही पुस्तके सुपूर्द करण्यात आली.

लॉकडाउनमध्ये वेळ आहे, पण पुस्तकं नाहीत, अशीही काही जणांची अवस्था आहे, पण ते वाचक इबुकचा आधार घेऊ शकतात. पण विलगीकरणातील लोकांना कदाचित अशी ऑनलाइन ई-बुक खरेदी करणेही शक्य होणार नाही. सरकार नागरिकांच्या आरोग्यासाठी शक्य ते प्रयत्न करत असताना एक नागरिक म्हणून आपण पण शक्य ती मदत करायला हवी, असे श्री. अनिल मेहता यांनी सांगितले.

**Postal Reg. No. PCW/086/2018 - 2020**
**RNI. NO. MAHMAR/2000/02739**
**No. CSO/Pune City/SR/3/2018 - Date : 10/01/2018**
Posting at BPC - Vishrambaug Wada, CSO, Pune - 411030.
Publication Date : 09/07/2020 Posting Date: 11/07/2020


## नवीन संहिता... नवा आशय...













**मेहता मराठी ग्रंथजगत**
१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,
टेलिफोन भवन समोर, पुणे-३०. फोन-०२० २४४७६९२४

प्रति,